

चैतन्य लहरी
जानेवारी - फेब्रुवारी २००९
मराठी





✦ प्रकाशक ✦

# निर्मल ट्रॉँसफॉर्मेशन प्रा. लि.

प्लॉट नं.८, चंद्रगुप्त हाउसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८

फोन : ०२०- २५२८६५३७, २५२८६०३२

# अनुक्रमणिका

१. परमेश्वर सर्वात शक्तिशाली
२. जिलबी पुडिंग
३. ख्रिसमस पूजेचे कार्यक्रम
४. संक्रांती पूजा





आता मला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत प्रवास करता येत नाही त्यामुळे तुम्हाला माझे कार्य करावे लागेल, ते म्हणजे लोकांना आत्मसाक्षात्कार देणं .

गुरू पूजा - २० जुलै २००८

# परमेश्वर

## सर्वात शक्तिशाली



४ मार्च १९७९
डेहराडून, (अनुवादित)

‘अती विचार करणे, अती नियोजन करणे ही शरीराच्या दृष्टीने काही चांगली गोष्ट नाही आणि समाजाच्या दृष्टीनेही.’

**मी** आज सकाळी तुम्हाला सांगितले होते की, कुंडलिनीच्या आधी पहिल्या चक्राच्या ठिकाणी श्री गणेश बसलेले आहेत, श्री गणेशाचे ते स्थान आहे आणि गणेश हे पवित्रतेचे प्रतीक आहेत. पावित्र्य स्वयं साक्षात आहे. तर हे पहिले चक्र झाले आणि हे जे चक्र आहे, ते आहे कुंडलिनीच्या खाली. ते केवळ कुंडलिनीचे रक्षणच करीत नाही तर जे लोक कुंडलिनी उत्थानासाठी जातात ते सतर्क राहतात. या मार्गाने कोणीही कुंडलिनीला स्पर्श करू शकत नाही. आज सकाळी मी सांगितले की जे लोक या मार्गाने उलट जाण्याचा प्रयत्न करतात ते फार मोठे पाप करतात. होय ते थोडे फार पैसे त्यातून मिळवितात. परंतु जी रक्कम ते एकत्र करतात, तीच एखाद्या दिवशी फारच त्रासदायक होते.

जे दुसरे चक्र आहे, ज्या स्वाधिष्ठान चक्रासंबंधी मी तुम्हाला सांगितले होते. यापासून आपण विचार करतो, कारण जेव्हा आपण बुद्धीतून विचार करतो, जेव्हा मेंदूचा वापर करून विचार करतो त्या मेंदूच्या ज्या चरबीच्या पेशी आहेत-करड्या रंगाच्या पेशी-त्या पोटाच्या चरबीपासून बनतात. पोटाच्या चरबीपासून डोक्याची चरबी हे चक्र बनविते. म्हणून विचार करताना या चक्रावर जास्त ताण पडतो. जेव्हा विचार करण्याची तुम्हाला सवय लागते, जसे आजकालच्या आधुनिक लोकांना विचार करण्याची सवय ही एक विकृती आहे. तर हे काम त्याला जास्त करावे लागते, त्यामुळे जी इतर कामे असतात ती बिघडून जातात. जसे मी सांगितले होते, मधुमेह याच कारणाने होतो. कारण स्वादुपिंड यामुळे नियंत्रित होते आणि हे चक्र दुसऱ्या गोष्टीत व्यस्त होते. दुसरे कार्य करणारी जी दुसरी जागा आहे, ती अशक्त होते. त्यात हे स्वादुपिंड, पाणथरी (स्प्लीन) व यकृताचा वरील भाग आहे आणि मूत्रपिंडही आहे. म्हणून अती विचार करणे, अती नियोजन करणे ही शरीराच्या दृष्टीने काही चांगली गोष्ट नाही आणि समाजाच्या दृष्टीनेही चांगले नाही. कारण मनुष्य तेव्हा जास्त विचार करतो जेव्हा तो परमात्म्याला मानत नाही. एका मर्यादेपर्यंत गेल्यावर परमात्म्यावर सोडून दिले पाहिजे.

देवी माहात्म्यात लिहिले आहे, संकल्प-विकल्प बदला. जसे भाऊसाहेब आहेत, कुठेतरी कामासाठी जात आहेत. तुम्ही पूर्ण नियोजन केले पण रस्त्यात अपघात झाला, हाताला मार लागला तर ते जाऊ शकले नाही. काम होणारे होते ते तर झाले का? फारच जास्त नियोजन तुम्ही केले असे समजा आणि तुम्ही वेळेवर पोहचू शकला नाही तर काम होणारच नाही. म्हणून असा संकल्प नाही केला पाहिजे की, आम्ही हे करून दाखवूच किंवा ते काम होणार आहे. त्यात विकल्प येतो. जेव्हा तुम्ही परमात्म्याच्या राज्यात जाता, तेव्हा त्याच्या पद्धतीने चालते. तुम्हाला पूर्णपणे समजते की कुठे जायचे आहे, कसे करायचे आहे कारण त्याचे नियोजन चालले असते. समजा तुमचे भाऊसाहेब जर पार झाले असते तर समजून घ्या ते त्या रस्त्याने गेलेच नसते. त्यावेळी ते गेलेच नसते. हे असे घडते. बऱ्याच जणांनी त्यांचे अनुभव लिहून ठेवले आहेत की त्यांना अपघात जरी झाला तरी ते जखमी झाले नाहीत. हा पार होण्याचा फार मोठा आशीर्वाद आहे की तुम्ही आता परमेश्वराच्या साम्राज्यात आलेले आहात व जसे की तुमचे सरकार ही सर्व काळजी घेत आहे. याप्रकारे जीवनात ज्या दुर्घटना घडतात, ज्यांना दुर्घटना म्हटले जाते, त्यांना टाळले जाते. खरं तर चांगल्या मनुष्याच्या मागे सैतानी शक्ती लागते. जीवनात तुम्ही बघता, की सज्जन माणसाच्या मागे ही वाईट शक्ती असते. त्यापासून वाचविण्यासाठी काही वेगळा प्रकार करावयास नको. त्याचे एकच आहे, परमात्म्याच्या कुशीत जा. ही सर्व सैतानी शक्ती आहे, जिच्यापासून तुम्ही सर्व लोक त्रास सहन करता आहात. ती तुमच्या मागे हात धुवून लागली आहे. तुम्हाला त्रास देत आहे. तिच्यापासून वाचण्यासाठी तुमच्याकडे काही साधन नाही कारण ती अतिशय सूक्ष्म आहे. तिच्या शक्त्या इतक्या सूक्ष्म असतात, तुम्हाला समजून येत नाही की त्या कधी धपाटा देतील,



'जेव्हा तुम्ही परमात्म्याच्या राज्यात जाता, तेव्हा त्याच्या पद्धतीने चालते.'

**‘जेव्हा तुम्ही परमात्म्याचे प्रिय बनता तो तुमची काळजी घेतो, तुमच्याकडे बघतो.’**

त्रास देतील. तिला तुम्ही समजू शकत नाही. परंतु तिचा परिणाम जरूर होतो. जेव्हा परिणाम घडून जातो, तेव्हा तुम्ही म्हणता,‘अहो साहेब, असे होईल असे आम्हाला वाटले नव्हते.’ तर तिच्यापासून वाचण्यासाठी परमात्म्याच्या पदराखाली जेव्हा तुम्ही राहाल मग प्रश्नच उरत नाही तुम्हाला काही त्रास होईल. ज्या वेळेस मृत्यू होणार असेल तेव्हा तर ते घडणारच आहे ही वेगळी गोष्ट आहे. परंतु मनुष्य जेव्हा पार होतो, तेव्हा त्याचा मृत्यू नाक, तोंडातून न होता सहस्रारातून होतो. म्हणजे त्याच्या नाका-तोंडातून रक्त येत नाही. आतापर्यंत तुम्हाला आश्चर्य वाटेल, सहजयोगात फक्त एक किंवा दोन जण मृत्यू पावले आहेत. हजारो लोकांना मी ओळखते. ते सर्व सत्तर-पंचाहत्तरच्या वयाचे आहेत. एक अठ्ठ्याण्णव वर्षाचे तर दुसरे त्र्याहत्तर वर्षाचे झाल्यावर वारले आहेत. तुम्ही दीर्घायू बनता. आकस्मित मृत्यू जे होतात ते या सैतानी शक्तींमुळे होतात. त्या कुणीही तुमच्यावर हात मारतात आणि तुम्हाला दु:खी बनवितात आणि गोष्टींची गडबड होते कारण त्यांचे वेगळे नियोजन असते. तुम्ही जर चांगले काम करण्याचे नियोजन केले तर ते त्यांचा हात मध्येच घालतात. परंतु जर तुम्ही आधीच नियोजन केले नसेल तरीही त्या तुमची मने वाचतात. या सैतानी शक्त्या तुमची मने अतिशय चांगल्या रीतीने वाचतात. इतकेच नव्हे तर तुम्ही माझ्याशी गप्पागोष्टी करीत असाल तर एखादा मनुष्य तुम्हाला भेटेल आणि सांगेल की ‘मला माहीत आहे श्री माताजींबरोबर तुमचे काय बोलणे झाले.’ तुमच्या मनातील ते ओळखतात. लगेच सांगतील तुमच्यात आपसात काय बोलाचाली झाल्या कारण तुम्ही तुमच्या मनात सारे नियोजन केलेले असते. तुमचे मन त्यांनी वाचलेले असल्याने तुम्ही या या रस्त्याने जाणार आहात त्याचे रहस्य त्यांना माहीत झालेले असते. म्हणून त्यांना हे रहस्य माहीत असते आणि तुम्हाला हे माहीत नसते की जगात या सैतानी शक्त्या किती विद्यमान आहेत?

हे जितके राक्षस स्वत:ला गुरू म्हणवतात हे सर्व सैतान आहेत. त्यांची शक्ती, संमोहन इत्यादी जे काही चालते, ते सैतानी, सैतानाची शक्ती आहे, जी तुमच्यावर काम करते. या शक्तींना ओळखण्यासाठी तुम्हाला सहजयोगात यावेच लागेल. त्यामुळे तुम्ही समजू शकाल, कोणती शक्ती कुठून घुसत आहे. कशाप्रकारे तुमच्यावर आघात करीत आहे, कशाप्रकारे तुम्हाला ती त्रास देणारी आहे. आता डॉक्टर मंडळी, जसे मानसिक तज्ज्ञ आहेत ते ओळखत नाही की प्रत्येक वेड्या माणसाच्या आत कोणते ना कोणते भूत घुसले आहे. तुम्ही त्याला ओळखत नाही. तुम्ही वरवर विश्वास ठेवता आणि त्याचा परिणाम तुमच्यावर होतो. आज आपल्याकडे ते आले होते व त्यांना भेटण्यासाठी मानसरोगतज्ज्ञ आले होते. त्यांना माहीत नव्हते, यांच्यापासून कसा बचाव करायचा, जसे समजा एखाद्याला टी.बी. चा आजार झाला आहे, तर आपण आपल्याला वाचविण्यासाठी प्रयत्न करतो कारण तो आजार आपल्याला होऊ नये. परंतु या सैतानी शक्तीपासून वाचण्यासाठी तुम्हाला काहीही माहिती नाही. आम्ही बघतही नाही कोणती सैतानी शक्ती आहे. आमचे जे बुजुर्ग होते ते हे ओळखत होते, परंतु आम्ही लोक इंग्लिश झालो, जसे मी सांगितले होते. ‘तर तुम्ही लोक ही गोष्ट ओळखत नाही की सैतानी शक्त्या जगात कशाप्रकारे कार्यान्वित आहेत आणि कशाप्रकारे तुम्हाला त्रास देत आहेत. परंतु परमात्म्यासमोर कुठलीही गोष्ट शक्तिमान नाही. परमात्मा सर्वात शक्तिमान आहे. जेव्हा तुम्ही परमात्म्याचे प्रिय बनता तो तुमची काळजी घेतो, तुमच्याकडे बघतो. तो तुमची देखभाल करतो. जसे, लहानमोठी जखम होते त्याप्रमाणे सज्जन माणसाला दुखापत झाल्यावर तो काळजी घेतो. लहान मुलांना तुम्ही ओळखता. वरून मुले पडतात, म्हटले जाते देवदूत उचलून घेतात.

मी सकाळी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे डावी व उजवी अशा दोन्ही नाड्या आपल्या आत असतात. त्यातील डावीकडे जसे तुम्ही जाता तर तुम्ही सामूहिक सुप्त चेतनेत (collective consciousness) व जेव्हा उजव्या बाजूकडे जाता तेव्हा सामूहिक अति चेतनेत (Supra consciousness) जाता. डावीकडे असे लोक राहतात. सामूहिक सुप्तचेतनेत मेलेले, अतृप्त असे लोक राहतात. जे अद्याप तृप्त झाले नाहीत व ज्यांचा आत्मा अजूनही भटकत आहे. परंतु हे फारच घाणेरडे आणि कमनशिबी, चोरटे-उचलेगिरी करणारे लोक आहेत.

दुसऱ्या प्रकारचे जे लोक असतात, ते फारच महत्त्वाकांक्षी असतात. हिटलरसारखे

महत्त्वाकांक्षी, हे लोकही दुसऱ्या बाजूकडे सामूहिकतेत असतात. आज मला एका महाशयांनी म्हटले,'मला आपर मंत्र द्या, माताजी!' जे लोक मंत्र देतात, फारच धोक्यात ठेवतात तुम्हाला. तुम्हाला माहीत असायला हवे. जसे तुम्हाला एखाद्याने राम मंत्र दिला, तुम्ही तर कधी विचारणार नाही की 'तुम्ही आम्हाला राम मंत्र का दिला?' आता तुम्ही राम, राम, राम बडबडत बसणार. आता राम म्हणजे तो काही तुमचा नोकर नाही. त्याला तुम्ही बोलवत आहात, हाका मारीत आहात. तुम्हाला काय अधिकार आहे? विचार करण्यासारखी गोष्ट आहे, जर तुम्हाला अधिकारच नाही तर तुम्ही कसे बोलवत आहात?

एक छोटीशी गोष्ट लक्षात घ्या. आमचे पंतप्रधान जे आता आहेत, त्यांना तुम्हाला भेटावयाचे आहे तर काय तुम्ही सरळ त्यांना म्हणणार का की 'मोरारजी, आमच्याशी बोला.' त्यांना भेटण्यासाठी नियम आहेत. सतरा ठिकाणी तुम्ही जाल, पळाल. यांना भेटाल, त्यांना भेटाल तेव्हा कुठे भेट होईल आणि पंतप्रधानाचे पंतप्रधान जे आहेत, ते इतक्या झटपट तुम्हाला थोडे भेटतील, की तुम्ही हाक मारीत राहिलात आणि ते हजर झाले. असेही असू शकते राम नावाचा नोकर इकडे तिकडे तुमच्यात घुसून बसला आहे आणि तुम्हाला एकदम वाटायला लागते,'अरे वा! मला तर एकदम शांती मिळाली.' कारण काय तर त्याने तुमचे काम ऐकले. तुमच्या अंकित झाला. तुम्हाला वाटू लागते माझे काम तर मजेत झाले. काय तुम्ही हे ओळखले नाही की दुसरा तुमच्यावर लादलेला आहे आणि ह्या लादलेल्या दुसऱ्या मनुष्याचे ओझे तुमच्या शरीरावर लादून तुम्ही चालत आहात. पाच-सहा वर्षांने तुम्ही बघाल तुमचे शरीर थरथर लटपटायला लागेल आणि मनुष्य एकदम अशक्त बनेल. या शक्तीशी पण परिचित असायला हवे. सहजयोगात आल्यावर जेव्हा तुमच्यात व्हायब्रेशन्स येतात तेव्हा तुम्ही बघू शकता की आसपास किती सैतानी शक्त्या आहेत आणि परमात्म्याची शक्ती कशाप्रकारे तुम्हाला प्रत्येक गोष्टीत यशस्वी करीत पुढे नेत आहे! कशाप्रकारे तो रस्ता शोधून तुम्हाला योग्य रस्त्यावर पोहचवीत आहे हे बघण्यासारखे आहे. याचे प्रत्यंतर अनेकांना आले आहे व तुम्हालाही येईल. म्हणून तुम्ही पार होऊन जा आणि या गोष्टीला प्राप्त करून घ्या.

मी नाभी चक्रासंबंधीदेखील सांगितले होते. या चक्रात आपला जो शोध आहे त्याचे बीज आहे. जेव्हा प्राणी अन्न शोधतो, तो याच कारणाने. तसेच मनुष्य जेव्हा परमात्म्याला शोधतो, तोही याच कारणाने. परमात्म्याचा शोधही मानवाच्या आतून झालेला असतो. हा शोध त्याच्या आतून आहे, तो माना वा मानू नका. जोपर्यंत तो पूर्ण शोधणार नाही. तोपर्यंत त्याची तृप्ती होत नाही. त्याला परमात्म्याला शोधून काढायचे आहे. जेव्हा तो परमात्म्याला शोधायला लागतो, तेव्हा सर्व बाजूंनी पुरवठा सुरू होतो. तुम्ही जाणता की कसे लोक जगात परमात्म्याच्या नावाने कुठलीही गोष्ट विकायला तयार असतात. खोट्यानाट्या गोष्टी तुम्हाला विकत असतात. अशा लोकांच्या बाबतीत काहीही म्हणा, त्या लोकांच्या संबंधी वर्तमानपत्रात छापलेले असते. तरीही लोक त्यांच्या चरणावर जातातच. का जातात? कारण ही एक प्रकारे मंत्रमुग्धता आहे, संमोहन आहे, एक खोटेपणा आहे. या खोटेपणाला मानायला लागतात व त्यापासून सुटू शकत नाही. फारच अवघड होऊन जाते त्याच्या एका खोट्यापासून मुक्ती मिळविणे. या चक्राच्या चोहोबाजूने तुम्ही बघता हिरवा रंग पसरला आहे हे भवसागर आहे. मनुष्याच्या आतदेखील भवसागर आहे. या भवसागराला पार करण्यासाठी कुंडलिनीला काही तरी सोपा मार्ग, काहीतरी पूल बनविणे आवश्यक आहे आणि हा ब्रीज तयार होणे, सहजयोगातच शक्य आहे. जर तुम्ही माझ्याकडे हात केले असतील किंवा एखाद्या आत्मसाक्षात्कार प्राप्त झालेल्या आत्म्यासमोर हात पसरले तर तुमच्यात चैतन्य लहरी जातात त्या तुमच्या हातातून आत जाऊन तिथे ब्रीज तयार करतात व त्या ब्रीजमधून कुंडलिनी वर चढते. परंतु जर यात काही बिघाड असेल या ब्रीजमध्ये किंवा नाभीचक्रावर किंवा याच्या चोहोबाजूनी असलेल्या भवसागरात, जिथे गुरुंचे स्थान आहे. आपल्याकडे दहा गुरू मानलेले आहेत त्यांना primordial master म्हणू शकता. त्यांच्याबाबतीत मी तुम्हाला सांगितले आहे. पण खोटारडे गुरू देखील बरेच आहेत आणि ज्या मनुष्याने या अगुरूचा पदर पकडला आहे, त्याची कुंडलिनी या ठिकाणाहून वर चढत नाही. अडकते. त्याची दोन चक्रे पकडतात. एक नाभी आणि दुसरे हे. जर एखाद्याला विचारले तुमचे गुरू

**'सहजयोगात आल्यावर तुम्ही बघू शकता की आसपास किती सैतानी शक्त्या आहेत.'**

‘जो खरा गुरू असेल, तो त्याच्या शिष्यावरून आम्ही ओळखतो, त्याच्या कुंडलिनीवरून ओळखतो.’

कोण आहेत? तर त्यांनी सांगितले फलाण्या ठिकाणी कुणी ढोंगानंद आहेत. जे पण नाव असो असे नाव ठेवतात. परमेश्वरच वाचवो त्यांना. ते आमचे गुरू आहेत. असं का? तर असे गुरू चांगले नाहीत, ज्यांची कुंडलिनी थांबते नाभीवर. आता आमच्याकडे आले आहेत पार होण्यासाठी. आले आहेत ना? आता तुमचा इलाज करण्यासाठी आला आहात. समजा की तुम्ही काही कुपथ्य केले असेल तर सांगायला पाहिजे की नको? तुम्हाला डॉक्टरांनी सांगितले की आंबट खाल्ल्याने इतके नुकसान आले आहे, तर डॉक्टरांशी तुम्ही वाद घालणार काय, की आंबट खाणेही ठीक आहे म्हणून. हे तर वेडेपणाचे लक्षण आहे. पण त्या गुरूला मध्ये घेऊन भांडण करीत बसाल. चला, एक मिनिटासाठी ही गोष्ट मानली की, तुमचे गुरू चांगले असतील, तर तुम्ही पार व्हाल. आई म्हणते, ‘जो खरा गुरू असेल, तो त्याच्या शिष्यावरून आम्ही ओळखतो, त्याच्या कुंडलिनीवरून ओळखतो.’

आम्ही तर कोणत्याही गुरूला ओळखत नव्हतो. जो कुणी आमच्यासमोर येत असे आम्ही समजून जात होतो की हा कोणत्या गुरूचा शिष्य आला आहे. महाराष्ट्रात एक गुरू होते, ते स्वत:ला वेगळे समजत होते. संन्यासी होते. माझे संन्यासी लोकांशी बिलकूल जमत नाही. कुणी संन्यासी समोर आला तर लोक विचार करतात, वा! यांच्याहून कुणी श्रेष्ठ नाही. यांचे संन्यासी जीवन कसे आहे? त्यांचे खाणे-पिणे कसे आहे? ते लोकांना कसे ओरबाडतात, फसवितात हे कुणी बघत नाही. त्याने संन्याशाचे कपडे घातले अन् ते मोठे झाले. त्यांच्या कुंडलिनीची एक विशेषता असते. त्यांची कुंडलिनी एकदम वर चढते व धाडकन् खाली येते. तिला बांधावे लागते. सगळ्यांची एकच तऱ्हा. यावरून तुम्ही ओळखाल की यांचे गुरू कोण आहेत. इतके खोटे गुरू जगात आले आहेत. तुम्हाला अंदाज येणार नाही. चांगले गुरूही आहेत.

आज मला एका महाशयांनी विचारले की, ‘खरे गुरूदेखील आहेत का?’ मी म्हटले, ‘होय, आहेत ना!’ आता अमरनाथला एक नागनाथ बाबा आहेत. ते कधी कधी येतात माझ्यासाठी. मला भेटण्यासाठी येतात. महाराष्ट्रात गगनगिरी महाराज. दक्षिणेत ब्रह्मचारी म्हणून आहेत. ते राहतात कालीकत येथे. ते ब्रह्मचारी आहेत. रंगूनमध्ये एक आहेत. असे आहेत बरेच. परंतु हे लोक समाजात, शहरात नाहीत, तर शहरापासून दूर, जंगलात राहतात. गगनगिरी महाराज म्हणतात, ‘जर आईच आलेली आहे, तर तुम्ही माझ्याकडे का येता?’ आम्ही जेव्हा कोल्हापूरला गेलो होतो, मी त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. माझे अनुयायी म्हणू लागले, ‘माताजी, तुम्ही तर सर्व गुरूंपासून, या सर्वांपासून त्रासलेला आहात. त्यांना का भेटू इच्छिता?’ मी म्हटले, ‘जरा व्हायब्रेशन्स तर बघा!’ तर सात मैल वर चढून जायचे होते. मी म्हटले की, ‘त्यांना भेटायला आम्ही वर चढून जाऊ.’ तेव्हा सर्वांनी हात असे केले नी सर्वांच्या हातातून थंड थंड लहरी वाहू लागल्या. म्हणाले, ‘चला.’ जेव्हा वर गेलो व बघितले तर ते बसलेले होते आपल्या मग्न अवस्थेत व नाराज होऊन, म्हणू लागले, ‘फारच पाऊस पडत होता आणि तुम्ही भिजून गेलात.’ आता बघा या लोकांनी या गोष्टींवर कसे प्रभुत्व स्थापित केले आहे. सूर्यावर, वर्षावर यांनी काम केले आहे. परंतु ते आत्मसाक्षात्कार फारच कमी देतात. त्यांनी एकाच व्यक्तीला जागृती दिली. मी म्हटले की, ‘बाबा, तुम्ही आणखी लोकांना आत्मसाक्षात्काराची अनुभूती का नाही दिली?’ ते सांगू लागले, ‘एकाला दिली आणि कान पकडले.’ पंचवीस वर्षे यावर मेहनत केली. प्रत्येक चक्रावर. खरी गोष्ट अशी की, त्यांना वेळ खूप लागतो. पण मला असा वेळ लागत नाही. मी तर यासाठी प्रसिद्ध आहे. परंतु या बिचाऱ्यांना खूपच वेळ लागतो. म्हणू लागले, ‘मलाच हजारो वर्षे लागली व्हायब्रेशन्स मिळवितांना. इतकी मेहनत त्यांच्यावर घेतली (अण्णामहाराज). जागृती आणि शुद्धी झाल्यानंतरही ते कामिनी आणि कांचनच्याच मागे लागलेले आहेत. आणि मला त्यांचे तोंडही बघायचे नाही.’

त्यानंतर एके दिवशी योगायोगाने फोनवर त्यांच्याशी (अण्णामहाराज) बोलणे झाले व माझ्या भेटीची वेळ ठरविली. कुणाकडे तरी आलेले होते. त्यांनी नालायकपणा केला. स्त्रियांनाही घेऊन बसले हाते. आम्हाला सांगू लागले, ‘आमचे महाराज तुम्हाला भेटण्याकरिता कधी कधी मुंबईला येतात. त्यांचे वय १०८ वर्षे आहे.’ पण ते ज्यांची गोष्ट करीत होते ते तर त्यांची बैठक सोडत नाहीत. मग यांना काय गरज होती इथे येण्याची? खरं तर त्यांच्या येण्याने यांच्या पोटावर पाय पडत असेल. ते

आपल्या गुरूवर नाराज होते. तर मी म्हटले,'अरे वा! आम्ही तर आता जात आहोत. आता असे करा मी तुम्हाला कुंकू लावते.' आम्ही त्यांच्या आज्ञेवर कुंकू लावले. 'आता तुम्ही मला लावा.' जसे त्यांनी कुंकू लावले, त्यांचे बोट इथे चिकटले. धकधक सुरू झाली व ओरडायला लागले म्हणू लागले,'आई, मला माफ करा. मला माफ करा.' मी म्हटले की, 'परत आपल्या गुरूबद्दल असे म्हटले तर बघा. माझ्यापेक्षा वाईट कुणी नाही. तुमची आज्ञा तर पकडली आहे. काय बाष्फळपणा करीत आहात. लाज नाही वाटत याठिकाणी स्त्रियांसोबत बसताना. इतकी तुमच्यावर २५ वर्षे मेहनत केली. चालते व्हा इथून.' नंतर त्या स्त्रियांनी सांगितले 'त्यांनी लोकांकडून सव्वा तोळे सोने आणि सव्वाशे रुपये घेतले.' त्यावेळी मी त्यांना सांगितले की परत जर ते आले तर त्यांना सव्वाशे जोडे मारा आणि सांगा आमची श्रद्धा या सव्वाशे जोड्यांची आहे. पण आमचे हात दुखतील म्हणून सव्वा जोड्याने तुम्हाला मारू. समजा, आत्मसाक्षात्कारानंतर असे दुर्वतन त्यांनी केले मग ते आत्मसाक्षात्कारी कसले? उलट व्यवस्थित नियोजन करून कुणाला कसे लुटता येईल? कुणाला ओरबाडता येईल? तर हे पक्के चोर, बिलंदर आहेत.

बरेच लोक तुरुंगातून सुटल्यावरच गुरू बनतात. तुम्ही आहात कुठे? त्यांच्यावर नाराज होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जे खरे आहे ते ओळखा. मी तुमची आई, तुम्हाला पूर्वसूचना देते आहे. प्रत्येक गल्ली-बोळात एक-एक गुरू बसलेला आहे. जर तुम्ही त्यांचा पत्ता मिळविला आणि पोलिसांना लावून दिले त्यांच्यामागे, तर लक्षात येईल अर्धे ५०% लोक तुरुंगातून निघून फिरत आहेत. मुंबईवाले इकडे येतील, इकडचे मुंबईला जातील. लोकांना फसविण्याचा आणखी कोणता चांगला मार्ग आहे त्यांच्याकडे. जसे रावणाने सीतेला फसवून नेले. जितकी ही वाईट गोष्ट असेल तर ती हमखास चांगल्या गोष्टीला जोडली तर फसवणूक होते.

तुमच्यापेक्षाही अधिक परदेशी लोक बिचारे साधे-सरळ आहेत. म्हणतात, ते भगवान आहेत. मी म्हटले,'म्हणायला काय जाते? हे बोलणे आहे, बोलून टाकले.' त्यांनी म्हटले, 'त्यांनी वर्तमानपत्रातही छापले आहे!' पेपरला पैसे दिले व छापून आणले. मी म्हटले,'ते म्हणतात याचा अर्थ ते सत्य आहे कारण हे लोक याप्रकारचे आहेत की ते विचार करतात, की आम्ही जे सांगतो त्याचा काही अर्थ असतो.' येथे तर कुणाला काही सांगून काही होत नाही. यासाठी गुरूसाठी जे हे स्थान आहे, भवसागर, त्याला समजून घेणे जरुरी आहे. म्हणून आम्ही सर्वांना समाजासमोर मोकळेपणाने सांगतो. प्रत्येक गोष्टीसंबंधी १९७० पासून सर्वांना सांगत आहे. सर्वांची नावे घेऊन ते काय काय गडबड करीत आहेत. परंतु कुणाची आजपर्यंत हिंमत झाली नाही किंवा ना कुणी आमच्यावर खटला भरला, ना पोलीस केस दाखल केली, ना काही. अगदी मोकळेपणाने सर्वांसमोर सर्वांची नावे घेऊन आम्ही सांगत आहोत की ते कसे बदमाष आहेत. कुणाची हिंमत झाली नाही. उलट सर्वजण मला येऊन सांगतात,'माताजी, तुम्हाला माहिती नाही, हे तुमचा खून करतील.' मी म्हणते,'करू द्या तर. मी बघते कोण मर्डर करतो माझा?' ना कुणी तक्रार केली ना कुणी एकही शब्द आमच्या विरोधात काढला. कारण त्यांना माहीत आहे त्यांची सर्व कुलंगडी-भानगडी मला माहीत आहेत. परंतु त्यांचे शिष्य जरूर असे आहेत जे माझ्या विरोधात कारवाई करत असतात. परंतु ते लोक नाही. ते सरळ गप्प बसून आहेत. सर्व एकाहून एक महाबिलंदर आहेत व तुम्हाला लुटीत आहेत, बावळट बनवत आहेत. म्हणून जागे व्हा, त्यांच्या चक्करमध्ये येऊ नका आणि याबद्दल वाईट वाटून घेऊ नका. तुमची आई आहे. आई सर्व खरेखरे सांगेल व तुम्हाला पूर्ण गोष्ट सांगेल. तुम्हाला त्याचे चांगले वाटो वा वाईट वाटो. मला काय सगळ्यांना चांगले म्हणत फिरा. बस, तुम्ही लोक नाराज नाही झाले पाहिजे. ते लोक कुणालाही वाईट म्हणत नाहीत. ते का म्हणतील? त्यांचा हेतू तुमच्या खिशासाठी आहे. तुम्हाला नाचविण्याचा त्यांचा हेतू आहे. ते तुम्हाला कुणाला चांगले वाईट म्हणतील. ईसामसीहने म्हटले होते,'सैतानाच्या घरात राहणारे लोक आपसात वाईटपणा घेऊन कुठे जातील?' परंतु कबीराने आवाज उठविला होता, नानकने आवाज उठविला होता, येशूने आवाज उठविला होता. कारण हे सर्व खोटे आहेत. मला यात घेणे देणे नाही. स्मगलिंग करा, काहीही करा, पैसे मिळवा. माझी काही हरकत नाही. चला, पैसे तर कमावले. पण तुमची कुंडलिनी खराब करून टाकतात. जो तुमचा

**'हृदयात आत्म्याचे स्थान आहे. आत्मा जो आपल्या आत आहे.'**

‘जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा तुमच्या चेतनेत आत्मा येतो.’

अधिकार आहे, सहजयोगाचा, परमात्मा मिळविण्याचा अधिकार आहे. त्यांच्यावर हात मारतात. म्हणून त्यांच्या विरोधात आहे.

आता जे याच्या वरचे चक्र आहे त्यासंबंधी-ते हृदयचक्र आपण म्हणतो. आतापर्यंत मी इतर चक्रांविषयी सांगितले आहे. हृदयात आत्म्याचे स्थान आहे. आत्मा जो आपल्या आत आहे. आमच्या क्षेत्राची त्याला माहिती आहे. त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. तो साक्षी आहे आणि प्रत्येक गोष्ट तो जाणतो. आपण काय करतो, काय करीत नाही. कुंडलिनी जागरणाने तुमच्यातील चेतना आहे ती चेतना आत्म्यात लीन होते. आतापर्यंत तुम्ही आत्म्याशी एकात्म नाही, संबंधित नाही. तो तुमच्या जाणिवेत, चेतनेत नाही. जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा तुमच्या चेतनेत आत्मा येतो, कारण आत्मा सर्वव्यापी शक्ती असल्याने तुम्ही देखील सर्वव्यापी होऊन जाता. यापुढे तुम्ही समजाल हळू हळू. आता हे हृदय चक्र आहे मधोमध हे तुमच्या आईचे, देवीचे, पहाडात निवास करणाऱ्या प्रसिद्ध जगदंबेचे स्थान आहे. या देवीने जगात अनेक वेळा अवतरण घेतले आणि या भवसागरात जे लोक परमात्म्याला शोधीत आहेत व ज्यांना राक्षसांनी फार सतावले होते त्यांच्यापासून यांचे देवीने रक्षण केले आहे. ही रक्षण करते. ज्यांचे हे सुरक्षेचे स्थान खराब झाले असेल, ज्याला असुरक्षिततेची जाणीव म्हणतात. तेव्हा हे चक्र धकधक करू लागते. स्त्रियांमध्ये जेव्हा असे घडते, त्यांना स्तनाचा कर्करोग होतो. दम्याचा विकारही या चक्राच्या खराबीमुळे होतो. हे सर्व चक्रांच्या एकत्रित संयोगामुळे होते. विशुद्धी चक्र ही यात येते. दम्याचा विकार दोन मिनिटात बरा होऊ शकतो. आम्ही काश्मीरचे गव्हर्नर सहाय साहेब यांचा पंचवीस वर्षाचा दमा एका क्षणात बरा केला. तुम्ही स्वत:ला सुरक्षित समजू लागता म्हणून हे चक्र महत्त्वपूर्ण आहे. या चक्राला कसे ठीक केले पाहिजे. ते सहजपत्रिकेत वाचा. इंग्लिश पुस्तकातही चांगल्याप्रकारे लिहिलेले आहे. याच्या मंत्र जागरणाने हे चक्र ठीक होते.

याच्याही वर हे जे चक्र आहे ते मनुष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या विशुद्धी चक्रातून १६ हजार नाड्या निघतात. हे श्रीकृष्णाचे चक्र आहे. यावर राधाकृष्ण बसलेले आहेत. याच्या डाव्या बाजूला विष्णूमाया, आदिमाया जी त्यांची भगिनी आहे, तिचे स्थान आहे व उजव्या बाजूला विठ्ठल, रुक्मिणीचे स्थान आहे. रामाचे स्थान सुषुम्नापासून जरा बाजूला उजव्या बाजूला आहे. हृदय चक्राच्या उजव्या बाजूला आहे, कारण तुम्हाला माहीत आहे, त्यांना पूर्ण मनुष्य बनण्यासाठी आपल्या अवताराच्या स्थितीपासून दूर केले होते. त्यांना आपण मर्यादा पुरुषोत्तम म्हणतो परंतु ते अवतारी होते. नाभी चक्रातून सर्व उत्क्रांती झाली. जे दशावतार झाले ते नाभीचक्रातून सुरू झाले.

नंतर सहावा अवतार रामाचा होता. तो या ठिकाणी आहे. त्यानंतर कृष्णाचा अवतार आहे. कृष्णाअगोदर परशुरामाचा अवतार झाला. त्यांचे अवतरण आवश्यक होते. परशुरामाचा अवतार अशासाठी झाला की ते या जगात येऊन आपल्या बळाने लोकांचा भविष्यकाळ ठीक करतील. कारण मनुष्याची बुद्धी सरळपणे ठीक होत नसते. तर त्यांनी आपल्या ताकदीने, शक्तीने लोकांना प्रथम तयार केले आणि परत जेव्हा ते आले, तेव्हा त्यांनी श्रीरामाच्या संबंधी सांगितले की हेच श्रीराम आहेत. या प्रकारे दोघेही बरोबर आले होते हे सांगण्यासाठी कारण श्रीराम हे पुरुषोत्तम होते व मनुष्यासारखे राहत होते. हे सांगण्याकरिता परशुरामासारखे अत्यंत जाज्वल्य असे अवतरण त्यांचेसह झाले. यानंतर श्रीकृष्णाचे अवतरण आपल्या विशुद्धी चक्रावर झाले.

हे विशुद्धी चक्र अत्यंत महान गोष्ट आहे. मनुष्याने जेव्हा आपली मान जनावरांपेक्षा वर उंचावली तर तो मनुष्य झाला, तेव्हा हे चक्र घटित झाले. श्रीकृष्ण जे आहेत ते विराटस्वरूप आहेत. समजा हे विराट आहे या विराटाच्या आत छोट्या छोट्या पेशी आहेत. तुम्ही देखील विराटस्वरूप आहात. तुम्ही जेव्हा जागृत होता तेव्हा तुम्ही विराटाशी संबंधित होऊन जाता. तीच परमात्म्याची शक्ती आहे. जिच्यासंबंधी मी सांगते आहे. तेच परमात्म्याचे साम्राज्य आहे. ज्यात तुम्ही जागृत होऊन जाता. सर्व पेशी याप्रकारे जेव्हा जागृत होतात तर पूर्ण विराट जागृत होऊ शकते. ही विराटाची शक्ती आहे. आता मोहम्मद साहेबांनी जो ‘अल्लाह हो अकबर’ चा मंत्र सांगितला. तो याचा मंत्र आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल या विशुद्धीची बोटे कानात घालून बघा. किती फायद्याची गोष्ट ते करून गेले. जर हे विशुद्धीचे बोट पकडले तर समजा विशुद्धी चक्र पकडले आहे. जर तुम्ही विचाराल तर

समजेल की होय माझा गळा खराब झाला आहे. तर हे विशुद्धीचे बोट कानात घालून मान, डोके वर करून 'अल्लाह हो अकबर' जेव्हा म्हणतो तेव्हा अकबराचा अर्थ आहे विराटाशी, मग विशुद्धी चक्र एकदम उघडते. तुमच्या डेहराडूनमध्ये विशुद्धी चक्र जास्त पकडले आहे. याची कारणे अनेक असू शकतात. त्याला तुम्ही समजून घ्या.

याचे एक कारण हे असू शकते की तुम्ही जास्त सिगारेट ओढत असाल वा तंबाखू खात असाल. त्यामुळे विशुद्धी चक्र पकडते. दुसरे कारण असे ही असू शकते, तुम्ही चुकीचे ध्यान करीत असाल किंवा चुकीचे मंत्र म्हणत असाल. यामुळेही विशुद्धी चक्र बिघडते. तिसरी गोष्ट आहे सर्दी, पडसे. कधी स्वत:ची काळजी न घेणे वा पथ्य ही बिघडणे. ज्या गोष्टी तुम्ही खाता, त्यामुळेही गळा खराब होतो व विशुद्धी पकडते. विशुद्धी यामुळेही बिघडते ज्यावेळी मनुष्य आपल्याला फार छोटा समजतो. जेव्हा तो विचार करतो की तो विराटाचा भाग नाही. जेव्हा तो हे समजून घेत नाही की तो सागराचा एक बिंदू आहे, तेव्हा विशुद्धी चक्र पकडते व न्यूनगंड तयार होतो. पाचवी गोष्ट ही आहे की जेव्हा आई-बहिणीची काळजी करीत नाही तेव्हाही डावी विशुद्धी पकडते किंवा जो मनुष्य फारच क्रोधाने बोलतो वा दुष्ट व्यवहार करतो त्याची विशुद्धी पकडते. अशी अनेक कारणे असतील व त्या कारणांशी घेणे-देणे नाही. गळ्यात अशी कंठमाला परिधान करा.

काल एक असे महाशय आले होते. माहीत नाही आज आले की नाही. ज्यांनी एक माला घातली होती. तुमच्या सोबत ते साहेब बसलेले होते. मी त्यांना म्हटले, 'तुम्ही ती माळ काढा.' तर ते नाराज झाले आणि मग त्यांनी ती काढली. मी नंतर विचारले तर ते चूपचाप माला घालून आतमध्ये बसलेले होते. मी त्यांना विचारले, 'तुमचे पिताजी कुठे आहेत?' ते सांगू लागले, 'त्यांचा स्वर्गवास झाला.' तर मी म्हटले, 'तुम्ही काही घातले आहे काय?' ते म्हणाले, 'होय, त्यांनी दिलेली एक गोष्ट आहे.' तर म्हणाले, 'श्री माताजी मानले आपल्याला.' त्यांच्या गुरूने दिलेली गोष्ट परिधान करून आतमध्ये बसलेले होते आणि बोटांवरून लगेच समजले. ते कसे काय? अगदी सरळ गोष्ट आहे. उजव्या हातावर हे जे हृदयचक्र आहे ते आहे रामाचे, जे पित्याचे लक्षण असल्याने यात वेदना होत होत्या. या बोटात वेदना होत होत्या म्हणून मी तुमच्या पित्यासंबंधी विचारले. इतक्या जोरात बोटात दुखत होते. मी समजून चुकले की कोणती ना कोणती गोष्ट त्यांनी घातली आहे. हे आता तुम्हाला समजले आहे. हे तर त्या मुलींनीही सांगितले होते, मी सांगितले नव्हते, पण मुलींनी तुम्हाला सांगितले होते. याप्रकारे हे चक्र पकडले होते आणि आता यांनी माळ काढली आणि ते पार झाले. जशी यांचेकडे ही गोष्ट आली. तशाच छोट्या छोट्या गोष्टीत लोक अडकतात. मी म्हटले काशीचा धंदा आहे, सोडून द्या. नाही सोडत. आम्ही इथे परम द्यायला बसलो आहोत. पण तुम्ही छोट्याछोट्या गोष्टी सोडत नाही. अरे, काशीचे पंडित कसे असतात? तुम्हाला माहीत नाही काय? मला तुम्हाला सांगावे लागेल, हे जे घाण काम ते करतात ते काय कामाचे? ते पण तुम्हाला सांगावे लागेल. एका पैशाची वस्तू एका रुपयाला विकतात. इतके दुष्ट व घाणेरडे लोक असतात. सारे या मंदिराची व्हायब्रेशन्स खराब करून टाकतात. यात वाईट वाटण्याचे काही कारण नाही. कुणाला वाईट वाटायला नको. सर्व तुम्हाला मंगल आणि कल्याणाची गोष्ट सांगत आहे. सर्व तुमच्यासाठी करीत आहे. अशा छोट्या छोट्या गोष्टीत तुम्ही अडकला आहात. या विशुद्धी चक्राच्या बाबतीत मी सांगत होते, जे विराट आहे.

यानंतर हे वरील चक्र आहे. हे चक्र महत्त्वपूर्ण आहे आज्ञा चक्र. आज्ञा चक्र बरेच सूक्ष्म असते. त्याच्या आतून कुंडलिनी वर चढणे अतिशय कठीण असते. दोन्ही बाजूंनी अहंकार व प्रति अहंकार दाब टाकल्याने हे चक्र अजून दबून जाते. जेव्हा मनुष्य कुणालाही क्षमा करीत नाही आणि रात्रंदिवस यासंबंधी विचार करीत राहतो की मला याने त्रास दिला, त्याने त्रास दिला. अशा व्यक्तीचे आज्ञाचक्र एकदम पकडले जाते आणि जे लोक चष्मा लावतात त्यांचेही आज्ञा चक्र जरा कमजोर असते. शारीरिक रूपाने. या आज्ञा चक्राची अनेक रूपे आहेत. ते तुम्ही वाचाल तर माझ्याजवळ जे पुस्तक आहे ते तुम्ही वाचाल तर तुमच्या लक्षात येईल, खूप लोकांनी यावर लिहिले आहे-आज्ञा चक्रावर. या आज्ञा चक्रावर महाविष्णूचे स्थान आहे. आता तुम्ही लोक महाविष्णूच्या बाबतीत काही जाणत

**'जेव्हा मनुष्य कुणालाही क्षमा करीत नाही -- अशा व्यक्तीचे आज्ञा चक्र एकदम पकडले जाते.'**

‘जितक्या पण मूर्तींची पूजा आपण करतो, त्या या हिशेबाने शून्य आहेत.’

नाही. परंतु देवी भागवत ज्यांनी वाचले आहे त्यांना माहीत आहे की महाविष्णूंना फार महान अवतार मानला गेला आहे. जो राधेचा पुत्र होता आणि या जगात आला. हे चौदा हजार वर्षापूर्वी सांगितले गेले. ते म्हणजे आपले ईसामसीह.

ईसामसीह हे महाविष्णूचे अवतरण आहे. आता मी जे सांगते ते खरे की खोटे हे कसे समजाल? याच्यासाठी एक सोपा उपाय आहे. तुम्ही विचारा की काय ईसामसीह हे महाविष्णूचे अवतरण आहे? बघा व्हायबेशन्स! ताबडतोब व्हायब्रेशन्स सुरू होतात. आज्ञा चक्रासाठी ‘लॉर्डस् प्रेयर’ हा मंत्र आहे. परंतु ते साक्षात ‘ॐ’ व ‘प्रणव’ पासून बनलेले आहेत. जणू श्री गणेशाचे ते अवतरण आहेत. ॐ, प्रणव आहे. त्यांनी साकार स्वरूप घेतले. आणि या जगतात तारण करण्यासाठी ते आले कारण ते ॐ व प्रणव होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पूर्ण उत्थान झाले. कृष्ण त्यांचे पिता आहेत कारण त्यांनी म्हटले होते, ‘नैनं छिन्दती शस्त्राणि, नैनं दहति पावकः’ हा जो प्रणव आहे, ओम आहे. तो कुठल्याही गोष्टीने नष्ट होत नाही आणि कोणत्याही गोष्टीतून प्रवाहित होत नाही. त्याची सिद्धता करण्यासाठी महाविष्णूचे अवतरण झाले. कृष्ण त्यांचे पिता होते. म्हणून त्यांना ख्रिस्त म्हटले गेले. आणि यशोदाचे नाव राखण्यासाठी त्यांना राधाजीने येशू म्हटले. त्यांची आई साक्षात राधा होती. महालक्ष्मीचे अवरण होते. हे सर्व आपले आहे. परंतु ते ओळखले पाहिजे. परंतु प्रणव निराकार आहे, ओम निराकार आहे. साकार, निराकार यासंबंधी लोकांनी भांडण उभे केले.

याबाबतीत मला स्पष्टीकरण करावे लागेल, नाहीतर हा एक कायमचा गैरसमज राहील आणि खास करून डेहराडूनमध्ये मी जास्तच बघते. इथे सनातन धर्म आणि आर्य धर्म वगैरेमध्ये मी-मी, तू-तू होत असते. खरंतर मिळालेले कोणालाही नाही. अनेक वर्षापासून चालू आहेत ही भांडणे. कुणालाही संतुष्ट मी पाहिले नाही. आता निराकार-साकार याची गोष्ट जरा समजून दिली तर हा संघर्ष संपेल. ज्यावेळेस आपली पिंगला नाडी उजव्या बाजूला बनली त्यावेळेस ही पाच तत्त्वे जी होती ती जागृत करण्याची गोष्ट होती. तुम्ही पंचमहाभूते जाणता ज्यापासून सृष्टी बनली आहे. ती जागृत करण्याकरिता यज्ञ वगैरे आपल्या वेदांनुसार केले गेले. स्मृती ग्रंथ वाचले गेले. यज्ञात ह्या पाच तत्त्वांना जागृत केले गेले. जसे मी सकाळी सांगितले होते. ही पाच तत्त्वे जागृत करण्याची गरज होती. अग्नीला जागृत करावे लागले, पाण्याला जागृत करावे लागले. कारण यांच्या जागृतीनंतर मनुष्य त्यांचा वापर करू शकणार होता. त्यांनतर शेतीवाडी सुरू झाली. आजचे विज्ञानही यामुळे लक्षात आले. आमची पिंगला नाडी जागृत झाली नसती तर आम्ही विज्ञानाचा विचार करू शकलो नसतो ना समजू शकलो असतो या पाच तत्त्वांचा कसा उपयोग करावयाचा, बीजं कशी तयार करावयाची व कशाप्रकारे अग्नीचा वापर करावा. अग्नीविषयी आम्हाला काही माहिती नव्हती व अग्नी तयारही करू शकत नव्हतो. हे सर्व करू शकलो म्हणून उजव्या बाजूची पूजा होते म्हणून यज्ञ होत राहिले आणि निराकारात या पाच शक्त्या आहेत. त्यांची निराकार पूजा त्याकाळी होत होती. परंतु त्यात जेव्हा लोकांनी आणखी पुढे विचार केला की आता जागृती केली पाहिजे. आता पुढे काय? तर आता मध्य मार्गावर आले आहेत. जेव्हा मध्य मार्गावर सुषुम्ना नाडीतून उर्ध्वगमन सुरू झाले तर त्यांनी बघितले की देवी-देवता या जागी बसलेले आहेत. ही जी पाच तत्त्वे बनलेली आहेत त्यापासून या चक्राची शरीरे बनली आहेत. त्यांची शरीर रचना या पाच तत्त्वांपासून बनली आहेत. तर त्यांनी मनन विधीमध्ये या देवतांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला, एका नंतर एक. मग त्यांनी सांगावयास सुरुवात केली की ही साकार दुसरी गोष्ट आहे. निराकारातून लोक साकाराकडे ओढले गेले. जसजशी चेतना वाढू लागली, तसतसे लोक येऊ लागले. त्यानंतर साकारावर जे आले त्यांची स्थिती तुम्हाला माहीतच आहे. याची पूजा कर, त्याची पूजा कर. एकप्रकारे कर्मकांड सुरू झाले. अंधश्रद्धा आली. धर्मान्धता आली, फारच वाईट स्थिती आली. तेव्हापासून एक मोठे परिवर्तन झाले. इतकेही नव्हे तर मोहम्मद साहेबांसारखे लोक या जगात आले. यांनी सर्वांनी सांगितले, निराकारही ठीक आहे. साकाराला नष्ट करा. खरेतर फारच गोपनीय होते हे सर्व. बायबलमध्ये लिहिले आहे. जे काही पृथ्वीने बनविले आहे, जे काही आकाशाने बनविले आहे त्याचे प्रतिरूप तर बनवा, फारच मार्मिक आहे हे. याला एक ख्रिश्चन लोक समजले की मूर्तिपूजा काय आहे? आता पृथ्वीने कोणती गोष्ट बनविली आहे, तुम्ही सांगा? त्याचे प्रतिरूप करून त्याची पूजा नाही केली पाहिजे. आता ख्रिश्चनांना सांगा, जितके स्वयंभू

लिंग आहेत, पृथ्वीने स्वत: बनविले आहेत आणि त्याच्या प्रतिकृती तुम्ही जे बनविता ते पूजनीय होतच नाही कारण ते अपूर्ण आहेत त्या co-efficience असतो व आकारही co-efficience असतो. त्या आकारामुळेच चैतन्य वाहते आणि हुबेहुब तसा आकार बनविणे असंभव आहे आणि जो बनवितो तो आत्मसाक्षात्कारी असायला हवा व त्याने ते विकले नाही पाहिजे. म्हणून जितक्या पण मूर्तींची पूजा आपण करतो, त्या या हिशेबाने शून्य आहेत.

आता तुम्ही जाऊन बघा, रांजणगावचा गणपती बिलकूल गणेश रूप आहे आणि ते पृथ्वीच्या आतून निघाले आहेत. कुणी त्यांना हात पण लावलेला नाही. अगदी अनादिकालापासून गोष्ट सांगितली जाते. मी स्वत: बघायला गेले होते. इतके व्हायब्रेशन्स त्या गणपतीत आहेत जणू जागृतपणे तेथे समाधी घेतली आहे. असे व्हायब्रेशन्स त्यांच्यातून येतात. म्हणून म्हटले गेले की प्रतिकृती मूर्ती बनवू नका. आम्ही लोक तर जिकडे बघाल तिकडे मूर्ती बनवित असतो. प्रत्येक गोष्टीची मूर्ती बनवून तिची पूजा करायला लागतो. त्याला co-efficience आहे किंवा नाही, त्यात चैतन्य आहे किंवा नाही ते जागृत आहे किंवा नाही. हे कोण बघते? म्हणून मूर्तीपूजा विरोध आहे. याचप्रकारे त्याकाळी ईसामसीहच्यावेळी झाले. कारण मूर्तीचा अर्थ असा होतो की लगेच पाया पडायला लागले. आता काबाच्या आत जो दगड आहे ते साक्षात शिवलिंग आहे. पृथ्वीतून उत्पन्न झालेले शिवलिंग आहे ते. हे महंम्मद साहेब ओळखून होते. जितकी शिवलिंगे आहेत ती साक्षात आहेत. परंतु ज्याला बघा तो त्याची मूर्ती बनवू पाहतो, मातीपासून, दगडापासून असे करण्याची अनुमती नाही. त्याची मूर्तीपूजा अयोग्य आहे. बाधक आहे. आता लोक मूर्तीपूजेच्या विरोधात बोलतात. ते एवढ्यापर्यंत म्हणतात की मूर्ती खोटी-खोटी बनली आहे. तिची पूजा करायला नको. इथपर्यंत ठीक आहे. परंतु परमात्मा साकार नसतो हे म्हणणे चुकीचे आहे. याचा अर्थ असा आहे की, तुम्ही एकच बाजू घेत आहात. त्याचे कारण तिसरेच होते. जेव्हा लोक साकाराची पूजा करायला लागले तर लोकांना जाणवले की ते चूक आहेत. समजा आम्ही तुम्हाला सांगिले की मध शोधून आणा तर प्रथम आम्ही फुलाचे वर्णन करू. फूल असे हवे, तसे फूल मिळेल. त्यातून मध आणा. तुम्ही गेलात आणि बघितले आणि फूल घेऊन आलात. आता फूलांची पूजा करू लागले. मध तुम्हाला मिळाला नाही. फक्त फुलांची गोष्ट होत राहिली, की फुले अशी असतात, फुलांचे हे करायला पाहिजे, ते करायला पाहिजे. पण या गप्पांमधून मध मिळत नाही. शेवटी त्यांनी सांगितले मध नाही मिळाला. तर आता दुसरी गोष्ट सुरू केली निराकाराची. त्याच्याही गप्पागोष्टी झाल्या. फक्त बौद्धिक जमाखर्च. तुम्ही मधाची गोष्ट करा वा फुलांची गोष्ट करा, तुम्हाला त्यातून मध मिळत नाही. जोपर्यंत तुम्ही स्वत: मधुकर बनत नाही, जोपर्यंत मधू जमा करण्यासाठी योग्य बनत नाही, तुम्हाला मध मिळू शकत नाही. फुले आवश्यक आहेत. मध पण आवश्यक आहे आणि मध मिळविण्यासाठी ते ही जरूर आहे. ज्याला मधुकर म्हणतात. आता ही भांडणाची गोष्ट आहे, जी प्रत्येक गोष्टीत संघर्ष निर्माण करते. सत्य एकच आहे ज्यात कधी संघर्ष होऊ शकत नाही.

आता त्या काळात जेव्हा आम्ही पाच तत्त्वांचे प्रबोधन करीत होतो. त्या गोष्टींना घेऊन आज भांडण करण्याचे काही कारण नाही. कारण हे बिलकूल सत्य आहे की परमेश्वर अवताराच्या रूपात अवतार घेत होते, या जगात येऊन व मानवाचा उद्धार करीत होते. ही सनातन गोष्ट आहे आणि यज्ञ करणेदेखील सनातन गोष्ट आहे. ज्यामुळे आपले ही पाच तत्त्वे आहेत. त्यांची आपल्या आतून शुद्धी करायला पाहिजे. कारण जर चक्र शुद्ध नाही झाले तर माझे सांगणे व्यर्थ आहे. ही देखील आवश्यक गोष्ट आहे व आत्म्याला ओळखणे देखील जरुरीचे आहे आणि हे जर समजून घेतले तर वाद-विवादाचे कारणच नाही. बाष्फळ गप्पाही व्यर्थ आहेत. आणि हजारो पुस्तके लिहून-लिहून ज्याप्रकारे लोकांमध्ये कलह उभे केले जातात. ते सर्व बेकार आहेत.

कालच एक साहेब आले होते व ते म्हणत होते, मी गायत्री मंत्र म्हणतो. मी म्हणाले का म्हणता? ते पार होत नव्हते. मी म्हटले 'गायत्री देवीच्या बाबतीत सांगा.' तर सांगायला लागले,'आम्ही साकाराला मानीत नाही.' 'अरे वा! तुम्ही मानत नाही तर कोणत्या आधारावर मानत नाही कारण तुम्ही आर्य समाज कुटुंबात जन्मले, आर्यसमाजी बनले. मनुष्याची स्वतंत्रता कुठे गेली?

**'रांजणगावचा गणपती बिलकूल गणेश रूप आहे आणि ते पृथ्वीच्या आतून निघाले आहेत.'**

कारण तुम्ही हिंदू समाजात पैदा झाले, हिंदू बनले. तुम्ही मुसलमान पैदा झाले असते किंवा कुणी आफ्रिकेत पैदा झाले असते.' जर तुमचा पुर्नजन्मच नाही तर तुम्ही कुठेही पैदा व्हाल. होऊ शकते की तुम्ही पूर्वजन्मी कट्टर मुसलमान असाल आणि आज कट्टर ब्राह्मण झाले आहात. होऊ शकते व होतेही. एका अती मधून दुसरा अती नेहमी घडतो. एका कट्टरता मधून दुसरी कट्टरता निर्माण होते. सत्य कट्टर नाही, तर सत्य साक्षात आहे. तर हे सत्य स्वीकारण्याचा आपला प्रयत्न आहे व असत्य त्यागले पाहिजे. आज हेच होत आहे. तुमची तरुण मुले ती परमात्म्यावर विश्वास ठेवीत नाहीत. त्यांना माझी गोष्ट बेकार वाटू लागली आहे. सर्व जगात असेच आहे, तुमचीच गोष्ट नाही. तुमच्यापेक्षाही इतर ठिकाणी हे घडत आहे. काही ठिकाणी तर लोकांनी परमात्म्यावरील विश्वास सोडून दिला आहे.

अल्जेरियाचे एक आपले साधक शिष्य आहेत. इंजिनियर आहेत, आमचेकडे आले होते. मुसलमान आहेत ते सर्व. तिकडे जितके जास्त शिकलेले तरुण आहेत, इंजिनियर, डॉक्टर, आर्किटेक्ट वगैरे त्यांचा परमात्म्यावर विश्वास नाही. त्यांच्यापैकी हे एक महाशय होते. ते कसेतरी आमचेकडे आले आणि पार झाले. एका विश्वासाला धर्मान्धतेतून बाहेर काढून अविश्वासाकडे जेव्हा मनुष्य झुकतो तेव्हा मधोमध सहजयोग त्याला पकडतो. जेव्हा त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. आज त्यांनी ५०० सहजयोगी बनविले आहेत, जे मुसलमान आहेत. जे विष्णूची देखील पूजा करतात आणि मोहंमदांनाही मानतात. यासाठी नाही की मी सांगितले म्हणून. त्यांच्याशिवाय त्यांचे कामच होत नाही. जर तुमच्या पोटात कॅन्सर आहे व तुम्ही धर्मांध आहात, तर मोहंमदसाहेबाचे नाव घ्यावेच लागेल. तुम्ही घेणार नसाल तर मी ठीक करू शकणार नाही. जर तुम्ही मुसलमान आहात आणि तुम्हाला पोटाचा कॅन्सर झाला असेल तर, तुम्हाला दत्तात्रेयाचे नाव घ्यावे लागेल आणि विष्णूचे नाव घ्यावे लागेल. कुणाची काही मक्तेदारी नसते. ते भगवान माझे, हे ही भगवान माझे. आता तर धर्माचे राजकारण झाले आहे, तेव्हा भगवानच वाचवो त्यांना. जे लोक धर्मात राजकारण आणण्याची गोष्ट करतात, त्यांना विचारा की ते धर्माच्या बाबतीत काही जाणतात तरी का? धर्मात राजकारण होऊ शकत नाही.

तुम्हाला मी विशुद्धी चक्रासंबंधी सांगितले. आता आज्ञा चक्राविषयी सांगितले. जेव्हा कुंडलिनी आज्ञा चक्र भेदते, तेव्हा तुम्ही निर्विचार होता. निर्विचारिता तुमच्यात वाहू लागते. हे देखील चक्र येथे फार पकडते माहीत नाही कां? तुम्ही क्षमाशील कमी आहात. क्षमा करायला पाहिजे. क्षमाशील होणे अगदी जरूर आहे. आम्ही क्षमाशील नसलो तर परमात्मादेखील आम्हाला क्षमा करीत नाही. आम्हाला फार त्रास होतो. म्हणून आपल्यालाही क्षमा करावयास हवी, त्यामुळे परमात्मा आम्हाला क्षमा करील, नाहीतर परमात्मा आम्हाला आमच्या चुकीबद्दल का क्षमा करेल? क्षमाशीलता फार जरुरी आहे. म्हणून मी तुम्हाला वारंवार तुम्हाला सांगते तुम्ही सर्वांना क्षमा करा. पूर्णपणे क्षमा करा.

शेवटी जे तुमचे चक्र आहे. ज्याला सहस्रार म्हणतात. ते हजार पाकळ्यांनी बनलेले आहे. डॉक्टरांच्या मते ९९२ नाड्यांचा हिशेब आहे, त्या हजार आहेत. कमळाच्या सारख्या अनेक रंगाच्या पाकळ्या आहेत आणि त्या जेव्हा उघडतात तेव्हा कुंडलिनी ब्रह्मरंध्र छेदून यातून बाहेर पडते. याचे नाव ब्रह्मरंध्र आहे. रंध्र म्हणजे छेद आणि तो आहे ब्रह्माचा. ब्रह्म म्हणजे सर्वव्यापी शक्ती जी कार्यान्वित होते. परमात्म्याची जी शक्ती आहे ती सर्वव्यापी आहे. आपल्या आत जशी ती छेद देते ती आपल्या आत स्थापित होते. तुम्ही देखील सांगू शकता की दुसऱ्यामध्ये काय समस्या आहे. ती सामूहिकता तुमच्या आत जागृत होते. ही भाषण देण्यासारखी गोष्ट नाही. ही घटना घडणारी आहे.

येथे आज माझा शेवटचा दिवस आहे. मी दिल्लीला जाणार आहे. मी कालदेखील सांगितले होते की काही लोकांनी येथे एखादी जागा नक्की करा. कुणाच्याही घरी लहानशी जागा. एखाद्या सेंटरप्रमाणे व्हावे. जेथे सर्वांचे संबंध जुळतील. त्यासाठी फार मोठ्या जागेची गरज नाही. एखादा असा पत्ता असावा ज्याठिकाणी सर्व लोक येतील व डेहराडूनचे नवे केंद्र सुरू होईल व येथे कार्य सुरू होऊ शकेल. आम्ही दिल्लीहूनही काही लोक येथे पाठवू. जे तुम्हाला सर्व समजावून सांगतील, तुम्हाला मदत करतील. अनेक प्रकारचे आजार बरे होतील. कॅन्सर व प्रत्येक प्रकारचे आजार बरे होतात. ते तुम्हाला शिकवतील. तुम्ही जागृत व्हाल. तुमची प्रगती होईल. परंतु असा प्रयोग आम्ही आजपर्यंत केला नाही की ज्या ठिकाणी आम्ही गेलो व जेथे प्रथमपासून कोणी सहजयोगी राहत नाहीत. हा पहिलाच प्रयोग आहे कारण येथे आमची नात या येथील शाळेत शिकत होती. मागील वेळेस मी जेव्हा या ठिकाणी आले होते तेव्हा विचार आला की ही महान तपोभूमी आहे आणि इथे असे सुरू करण्यास काही हरकत नाही आणि काही लोक जोडले पण गेले. परंतु असे एखादे ठिकाण इथे झाले तर लोक येथे येऊ शकतात. साधारण घर असेल तरी चालेल. असे ठिकाण, जिथे लोक येतील व पार होतील. या गोष्टीसाठी ते शहरापासून फारसे दूर नसेल. त्यानंतर लोक बाहेरून येत राहतील व पूर्ण रीतीने तुम्ही त्यांचे मार्गदर्शन घेत राहाल व प्रगती कराल.

आणि हे साहेब बसलेले आहेत. त्यांचा अनुभव बघा. त्यांना सकाळी व्हायब्रेशन्स येत नव्हती व कशाचा तरी अडथळा होत होता. आणि कुणीतरी सांगितले की विचारून बघा, श्री माताजी कोण आहेत. आणि हे म्हटल्याबरोबर धाडधाड व्हायब्रेशन्स सुरू झाले. त्यांना या गोष्टीने फारच हसू आले. असाच चमत्कार होतो. एखाद्या गोष्टीवर मनुष्य थांबून जातो. एक छोटीशी ठिणगी डोळ्यात गेली, एक कणही गेला तरी सारे आकाश डोळ्या समोरून लुप्त होते. त्याप्रमाणे छोट्या छोट्या गोष्टीत आपण अडकून पडतो, ज्या

काही प्रश्न असेल तर विचारा. एखादाच विचारा. इतर काही विचारण्यात वेळ घालवू नका. जी गोष्ट तुमच्या आत आहे ती घटीत व्हायला हवी, तुमची संपत्ती ती प्राप्त करायला हवी. आता लोक लहान लहान गोष्टीत अडकून जातात. आत्ताच ते सांगत होते आम्ही हिरे घातले आहेत. त्यांनी विचारले की,'श्री माताजींनी हिऱ्याची अंगठी का घातली आहे?' तर आमच्याकडे बऱ्याच आंगठ्या आहेत आणि माझ्या पतीची इच्छा आहे की आम्ही सर्व अलंकार परिधान करावेत. खरं तर माझे पती..... इथे माझ्या पतीला लोक ओळखतात. ते फारच इमानदार आहेत. त्यांनी वाममार्गाने एकही पैसा मिळवलेला नाही. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की ही हिऱ्याची अंगठी खरी नाही. खोटी अंगठी आम्हाला कुणीतरी भेट दिली. ती आम्ही घातली. ही तर माया आहे. खोटी हिऱ्याची अंगठी! खरं तर बऱ्याच साऱ्या अंगठ्या आमच्याकडे आहेत. हिऱ्याची पण आहे, पण आम्ही खोटी अंगठी घातली. प्रेमापोटी आम्ही कोणाकडून एकही पैसा घेत नाही. आता माझे पती आहेत व पिता पण श्रीमंत होते. सर्वकाही आहे, मग थोडेफार आम्ही घालतो. थोडे घालतो. माझ्या पतीची आवड आहे की आपली पत्नी सुहासिनी आहे तिने अलंकार घालावेत. यासाठी आम्ही ते घालतो. आम्ही कुणी संन्यासी नव्हेत. तुमच्याकडून घेऊन काही वापरीत नाही. परंपरागत जे वापरायला हवेत, तेच वापरतो. आम्ही संन्यासी नाही. कुणी साधू नाही. आता आम्ही काय घातले, काय नाही या गोष्टीची बाष्फळ चर्चा करण्यात काही अर्थ नाही. आणि या गोष्टीच्या जे बातम्या करतात ते चोर लोक आहेत. सर्कशीतल्या उलट्या उड्या मारीत आहेत, ढोंगी बनून तुमच्या समोर उभे आहेत व तुम्ही देखील त्यांना अनुकूल होता. इथे हे समजून घेतले पाहिजे की तुम्हाला स्वीकारायचे आहे. आम्हाला नाही. आम्ही देण्यासाठी बसलो आहोत. तुम्हाला मिळाले नाही तर तुमचे दुर्दैव! तुमच्यासाठी वाईट असेल ते. तुमचे नुकसान करणारे असेल आमचे नाही. आज सकाळी मी तुम्हाला सांगितले की मला तुमच्याकडून काही घ्यायचे नाही. मत पण घ्यायचे नाही. निवडणूकही लढवायची नाही. काही नाही. काही नाही. मला तुमच्याकडून मानसन्मान देखील नको. पण जे तुमच्या आत दडलेले आहे ते मिळवा. हे आईसारखे मी तुम्हाला समजावत आहे. जर तुम्ही तुमच्या आईला ओळखत असाल तर हे समजू शकता. तुमच्यावर प्रभाव टाकण्यासाठी मी इथे आलेले नाही. आणि त्यातून मला काय मिळणार? तुम्ही आम्हाला काय देणार ते सांगा. मला फारच आश्चर्य वाटले की सुशिक्षित स्त्रीने याप्रकारे गोष्ट करावी फारच आश्चर्य वाटले. म्हणूनच कदाचित या जन्मी माझे पती इतक्या उंच पदावर पोहोचले, ज्यामुळे जग काही म्हणू नये. कारण लोक इतके मूर्ख असतात, इतके मूर्ख असतात ते



# जिलबी पुडिंग



**साहित्य :-**

२५० ग्रॅम जिलबी, ७५० मि.ली. दूध, साखर चवीनुसार

१/४ छोटा चमचा वेलची पावडर

१/४ छोटा चमचा केशर

काही थेंब केवडा जेल

१ १/२ मोठा चमचा साल काढलेले चांदीच्या वर्खचे बदाम

१ १/२ मोठा चमचा कापलेले बदाम

**कृती :-**

१) जिलबीचे छोटे तुकडे करा.

२) दूध उकळा, जिलबीचे तुकडे त्यात घाला. मंद आचेवर शिजवा आणि मधूनमधून हलवत राहा. जेव्हा त्याला घट्टपणा येईल तेव्हा उरलेले साहित्य त्यात घाला. आवश्यकतेनुसार साखर घाला. अजून पाच मिनिट मंद आचेवर हलवत राहा व शिजवा.आचेवरून उतरवा.गरम किंवा थंड वाढा.

साधारणपणे हा पदार्थ बनविण्यासाठी आदल्या दिवशी राहिलेल्या जिलेबीचा यासाठी उपयोग करा.

# ख्रिसमस पूजा

२५ डिसेंबर २००८



निर्मलनगरी, भूगाव येथे ख्रिसमस निमित्ताने श्री माताजींच्या साकार पूजेचे आयोजन दि.२४, २५, २६ डिसेंबर २००८ रोजी करण्यात आले होते. त्याचा थोडक्यात वृत्तांत -

**२४ डिसेंबर २००८ -**

आज कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी सकाळी १० वाजता हवनास प्रारंभ. सगळीकडे चैतन्यमयी वातावरण ओसंडून वाहतच हवन सोहळा संपन्न.

सायंकाळी कार्यक्रमाच्या सुरुवातीस, नियोजित वधू-वरांची नावे घोषीत करण्यात आली. अतिशय मंगलमय वातावरणात संगीत-सरिता आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात. या अद्वितीय पर्वणीचा लाभ रात्री उशिरापर्यंत सर्वांना मिळाला. त्यावेळीच इकडे प्रतिष्ठानवर रात्री १२ वाजता श्री माताजींना केक अर्पण करण्यात आला. त्यांनी तो कापून सर्वांना आशीर्वाद दिले.

**२५ डिसेंबर २००८ -**

सकाळच्या सामूहिक ध्यानाने कार्यक्रमाची सुरुवात. सकाळी ११ वाजता श्री.अरुण आपटे यांच्या अलौकिक व दैवी संगीताचा आनंद घेऊन सर्वजण सायंकाळच्या पूजेसाठी तयार झाले.

सायंकाळी ६.३० वाजता काहीवेळ सामूहिक ध्यान. त्यानंतर काही भजने होत राहिली. श्री माताजींच्या आगमनाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या दरम्यान पडद्यांवर श्री माताजींची १९८१ ची ख्रिसमस पूजा संदेश असलेली सी.डी.दाखविण्यात आली. सर्वजण चैतन्यात स्थित झालेले असतानाच सायंकाळी ७.३० वाजता आपण सर्वजण ज्या क्षणाची उत्कटतेने वाट पाहत होतो तो क्षण आला. सनई चौघड्याच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजीत, श्री माताजींचे निर्मलनगरीत आगमन झाले. स्वागतगीतानंतर पूजेची सुरुवात. सर्व योगीजनांनी पूजेचा स्वर्गीय आनंद अनुभवला. रात्री ९.०० वाजता आरती करण्यात आली. नंतर श्री माताजींसमोर केक मांडण्यात आला. श्री माताजींनी केक कापला व सर्वांना आशीर्वाद दिले. श्री पापाजींच्या हस्ते एक केक कापण्यात आला.

त्यानंतर काही आंतरराष्ट्रीय भेटी श्री माताजींच्या चरणांवर अर्पण करण्यात आल्या.

जवळजवळ ९.३० वाजेपर्यंत श्री माताजी निर्मलनगरीत होत्या.

**२६ डिसेंबर २००८ -**

सकाळच्या सत्राची सुरुवात पहाटेच्या सामूहिक ध्यानाने झाली. सकाळी १० च्या सुमारास नियोजित वधू-वरांना हळद लावण्याचा समारंभ छान रंगला. रात्री ८.०० वाजता श्री माताजींचे निर्मलनगरीत आगमन झाले. श्री गणेशपूजनाने लग्न समारंभाची सुरुवात झाली. श्री माताजींच्या दैवी उपस्थितीत हा सर्व लग्नसोहळा संपन्न झाला. अशा मंत्रमुग्ध वातावरणातच नवविवाहित जोडप्यांना श्री माताजींनी आशीर्वाद दिले. साधारण ९.३० वाजेपर्यंत श्री माताजी निर्मलनगरीत होत्या.

सर्वच कार्यक्रम अतिशय मांगल्याने भारलेला असा झाला.

**जय श्री माताजी।**

# संक्रांती पूजा

**राहुरी, दि.१४ जानेवारी १९८७**

‘पण सूर्यापासून शिकण्या सारखी .. हा देत राहतो. देतच राहतो. घेत काही नाही.’

**आ**जचा हा शुभदिवस आहे, आणि या दिवशी आपण लोकांना तिळगूळ देऊन गोड, गोड बोलायला सांगतो. आपण दुसऱ्यांना बोलायला सांगतो पण स्वत:लाही सांगितलेलं बरं! कारण दुसऱ्यांना सांगणं फार सोपं आहे. तुम्ही गोड, गोड बोला आणि आम्ही अद्वातद्वा बोलू. या अशा तऱ्हेच्या प्रवृत्तींनी आज कुणीच गोड, गोड बोलत नाही असं दिसतं. जिथे जा तिथे लोकं ओरडायला उभे राहतात. समजत नाही, ओरडायला काही कारण नसलं तरी आरडाओरडा केल्याशिवाय लोकांना बोलताच येत नाही. त्याला कारण असं आहे की आपण स्वत:बद्दल काही कल्पना करून घेतलेल्या आहेत. आपल्याला परमेश्वराच्या आशीर्वादाची मुळीच कल्पना नाही.

परमेश्वराने आपल्याला केवढा मोठा आशीर्वाद दिलेला आहे या देशामध्ये. बघा, की या देशामध्ये स्वच्छतेचा एवढा विचार नाही. या देशामध्ये तऱ्हेतऱ्हेचे किटाणू, तऱ्हेतऱ्हेचे पॅरासाइट्स आहेत. मी तर म्हणते की साऱ्या जगाचे पॅरासाइट्स आपल्या देशात आहेत. जे कुठेही सापडणार नाहीत ते या देशात आहेत. इतर देशांमध्ये इथून जर काही पॅरासाइट्स गेलेत तर ते मरूनच जातात. तिथल्या थंडीमुळे राहूच शकत नाही. सूर्याच्या कृपेमुळे इथे इतके पॅरासाइट्स राहतात या देशामध्ये आणि त्यांच्यावरती मात करून आपण कसे जिवंत आहोत! एका शास्त्रज्ञाने विचारले होते मला की ‘तुमच्या इंडियामध्ये लोकं जिवंत तरी कसे राहतात?’ ‘अहो, म्हटलं जिवंतच राहत नाही, हसत-खेळत राहतात. आनंदात राहतात. सुखात राहतात.’ त्याला कारण हा सूर्य.

या सूर्याने आपल्याला आपली घरं उघडी करायला शिकवलेली आहेत. आपलं हृदय उघडं करायला शिकवले आहे. इंग्लंडला जर तुम्हाला कुठे बाहेर जायचे असले तर पंधरा मिनीट तुम्हाला कपडे बदलायला लागतात. सगळं काही घालून, जामानिमा, शिरस्त्राण वगैरे घालून बाहेर निघावे लागते. नाहीतर तिथली सर्दी तुमच्या डोक्यात घुसून तुमचं डोकचं खाऊन टाकते. ही अशी तिथे परिस्थिती आहे. आज तुम्ही जे इथे उघड्यावर बसला आहात अशी इंग्लंडला काही सोय करता येत नाही. सगळे देश नुसते थंडीने गारद झालेले आहेत. आपल्या देशामध्येसुद्धा असे प्रांत आहेत. तिथे आपण म्हणून शकू की मोहाली किंवा त्या बाजूला तुम्ही गेलात नैनितालच्या पलीकडे, डेहराडूनच्या पलीकडे, हिमालयाच्या त्या बाजूला गेलात जसं त्या ठिकाणी आहे तसंच या ठिकाणी आहे. इतकी थंडी तिथे सुद्धा आहे. जसे इंग्लंडला आहे किंवा अमेरीकेला असते तशीच थंडी इथे आहे, पण तिथे चिटपाखरूसुद्धा राहत नाही. तिथे मोठमोठाली वनं आहेत आणि त्या ठिकाणी सुंदर फुलं आहेत. ‘व्हॅली ऑफ फ्लॉवर्स’ म्हणून लोकं सांगतात, इतकी सुंदर सुंदर फुलं आहेत की असं वाटतं की नंदनवन आहे. पण ते क्षणभरच. तिथे इतकी थंडी असते की ते बघायलासुद्धा, डोळे उघडायलासुद्धा तिथे प्रश्न असतो. डोळ्याला चष्मे लावून जावे लागते नाहीतर डोळ्यालासुद्धा त्रास होतो, इतकी तिथे थंडी आहे. तसच दुसऱ्या देशांमध्ये असूनसुद्धा त्यांनी तिथे वाढ करून घेतली आहे. सबंध वातावरणाशी भांडून, झुंजून त्यांनी आपले देश उभे केले आहेत. आपल्याला तर फार मोठे वरदान असतानासुद्धा आपण त्याकडे लक्ष देत नाही की सूर्याचे आपल्याला केवढे मोठे वरदान आहे!

आपल्या देशामध्ये सगळ्यात मुख्य म्हणजे सूर्याची उर्जा इतकी मोठी आहे. ती जर वापरायला सुरुवात केली तर आपल्याला उर्जेचा त्रासच राहणार नाही. मोटारीसुद्धा या उर्जेने चालू शकतात. पण आपल्याकडे आपले जे सत्ताधीश आहेत किंवा आपल्याकडचे जे लोक आहेत त्यांचे लक्षच दुसरीकडे असल्यामुळे सूर्याचे जे देणं आहे ते वाया जाते. त्याचे त्रास होतायेत. अती होतंय आपल्याला. ते वाचवून आपण पुष्कळ कार्य करू शकतो. पण सूर्यापासून शिकण्यासारखी मुख्य गोष्ट आहे ती त्याची देण्याची शक्ती. सूर्य हा देत राहतो. देतच राहतो. घेत काही नाही. देत राहतो. आणि देण्याची त्याची एवढी शक्ती आहे की त्या शक्तीवर इथे पाऊस होतो. त्या शक्तीवरती शेती होते. त्या शक्तीवरती उपज होते. जर सूर्य नसला तर इथे काहीही होणार नाही. त्याच्या या प्रेमाच्या

शक्तीमुळेच आज आपण या स्थितीला पोहोचलेलो आहोत, पण त्याच्यापासून शिकायचं म्हणजे असं की आपल्यातही देण्याची शक्ती आली पाहिजे. पण खालून वरपर्यंत जर आपण पाहिलं तर लोकांना असं वाटतं की याच्यात कसे पैसे वाचवायचे? स्वत:साठी कसे ठेऊन घ्यायचे? आम्ही पैसे दिले समजा काही कार्यक्रमाला तर त्याच्यातही लोकं म्हणतात याच्यातले पैसे वाचवलेले बरे! अहो, तुम्हाला सांगितलं कुणी वाचवायला? वाचवून ठेवा, पण कुणासाठी? अहो, तुम्हाला खर्चायला दिले तर कुणाला वाचवता? त्यातलेच पैसे. म्हणजे कसंतरी करून, काहीतरी सोसून घेतले पाहिजे. काहीतरी आपलं रोखून ठेवलं पाहिजे. ही सगळीकडे प्रवृत्ती. कुठे बाजारात गेलं, कुठं गेलं त्याच्यामध्ये आता आम्ही भाव वाढवला. कशाला? 'त्यांनी वाढवला म्हणून आम्ही वाढवला.' अहो, पण भाव जर तोच असला तर वाढवता कशाला? कसंतरी करून ती शक्ती शोषून घ्यायची. आता काहीही लहानसं जरी कार्य काढलं तरी लोक म्हणतात 'माताजी, हे बघा, तुम्हाला ते जमणार नाही.' म्हटलं का? कारण ते पैसे खातात. म्हणजे आम्ही काय जेवतो आणि ते पैसे खातात. आमचं काही जमणार नाही की काय? म्हणजे असा विचित्र प्रकार आहे की देशाचे जे हित करणारे आहेत, देशाचे जे कारभारी आहेत त्यांना सगळी काही सत्ता देवाने दिलेली आहे. त्यांनासुद्धा हे समजत नाही की आम्हाला द्यायचयं.

या सूर्यापासूनच शिकलं पाहिजे की आम्ही काही देण्यासाठी आलोत. घ्यायला आलो नाही. जोपर्यंत आमूलाग्र ही स्थिती माणसाची बदलत नाही की आम्ही द्यायला आलोत, घ्यायला नाही. त्याचा शौक असायला पाहिजे. जसा, तुमच्या आईला कसा शौक असतो की आज माझा मुलगा येणार. त्याच्यासाठी काय करायचं बरं? काय जेवायला करायचं? आज हे करावं की ते करावं. तिला कसा शौक असतो की काहीतरी करुन दोन -चार पैसे इकडून-तिकडून एकत्र करून, शेजारून काही तरी घेऊन ती काहीतरी गोड-धोड करून तुम्हाला घालते. तिला असं वाटतं की 'कसं देऊ नी कसं नाही.' तसाच शौक आतून आल्याशिवाय, इतर लोकांबद्दल तशी भावना आपल्यात जागृत झाल्याशिवाय आपल्या देशाचे काय कोणत्याच देशाचे कल्याण होऊ शकत नाही. पण कुणाकडून काय लुटता येईल? कुणाकडून काय घेता येईल? कुणाकडून काय मागता येईल? कुणाला कुठे फसवता येईल? या विवंचनेत आपण असतो आणि त्या विवंचनेमुळे आपल्या मुलांनाही त्रास होणार आहे. आपल्यालाही त्रास होणार आहे. या देशात कोणतही कार्य होऊ शकतं. काहीही म्हटलं तरी.

आज जी संक्रांत आपण करतोय त्याच्यामध्ये ही जी संक्रांती, संक्रांत म्हणजे एक शुभ अशी क्रांती जी करायची आहे ती ही की आमच्यामध्ये देण्याची प्रवृत्ती आली पाहिजे. आता हे सर्व म्हणतात की देण्याची प्रवृत्ती असावी. म्हणजे आता जर तुम्ही भटजीबुवाकडे गेलात की 'अहो, काहीतरी दान केले पाहिजे.' दान म्हणजे त्या भटजीला करायचे? तसं नाही. किंवा कुणी म्हणेल की दान केले पाहिजे. म्हणजे स्वत:चे पोट भरण्यासाठी. दान करावं म्हणून हे लोक अस भाषणं वगैरे देत असतात. त्याला काही अर्थ नाही. तुम्ही आम्हाला दान करा तरी तुम्ही तेच. दान तुम्हाला कशाला करायचे? म्हणजे दान करायचे तरी कुणाला? असा ही प्रश्न उभा राहतो. तेव्हा मुक्त मनाने आम्ही आमच्या देशासाठी, आमच्या बांधवांसाठी, आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांसाठी काय करतोय ते पाहिले पाहिजे. जीव रोखून राहिला नाही पाहिजे. मनसोक्त लयलूट केली पाहिजे. म्हणजे त्याचा एक विशेष आनंद असतो तो आम्ही नेहमी उपभोगत असतो. जीवापलीकडे द्यायचं. याच्यात जो आनंद आहे तो कशातच नाही. तो आनंद कशातच नाही. आणि तो आनंद मिळवायचा असला तरच आजचा सण साजरा केला पाहिजे. म्हणजे त्या सूर्यासारखा आपला स्वभाव असला पाहिजे. तो काही करतो असं त्याला काही कळत नाही. त्याला काहीही माहिती नाही. अकर्मात उभा आहे पण सारखा, सतत जळत असतो आणि सारखा तुम्हाला प्रकाश देऊन, हा आनंद देऊन, हे सगळं जीवनतत्त्व देऊन तुम्हाला तो पाळत असतो. रोज त्याला आपण बघतो. पुष्कळ लोक त्याला नमस्कारही करतात, पण नमस्कारापुरते. त्यातलं काही आपल्यात येत नाही. त्याची देण्याची शक्ती, त्याची क्षमता आपल्यात यायला पाहिजे.

मी एक लहानशी गोष्ट सांगितलेली होती की सर्व सहजयोग्यांनी झाडाच्या किनाऱ्यावरती

**'संक्रांत म्हणजे .. आमच्या मध्ये देण्याची प्रवृत्ती आली पाहिजे.'**

वडाची झाडं लावा. त्याला कशाला गव्हर्नमेंट कडून पैसे घ्यायचे? एकतर त्याला कुंपण घालायला काही लागत नाही. चला, यावर्षी हेच एक नुसतं झाडं लावू. त्याला एक कुंपण घालू. त्याला किती पैसे लागतात? अहो, विड्या जरी फुंकल्या तरी जास्त लागतात. एक हेच करून बघा. म्हणजे कुठेतरी काहीतरी करतोय आपण. हे दिसलं पाहिजे. उलट कसं कुणाला लुबाडायचं? कसं कुणाकडून पैसे घ्यायचे? कसे वाचवून घ्यायचे? या प्रवृत्तीमुळे आपल्या देशाची मुळीच प्रगती होणार नाही. बरं,असे आपल्याकडे पूर्वी लोक नव्हते. मी तुम्हाला सांगते आम्ही जेव्हा लहान होतो तेव्हा देणारेच लोक होते. आम्ही देणारेच लोक पाहिलेत. घेणारे आम्ही पाहिलेच नाहीत. घेतलं की त्यांना काही आवडायचं नाही. आई-वडिलांना सुद्धा कुणी मुलाने काही घेतलं की देऊन ये ते परत. कशाला घेतलं दुसऱ्याचं? द्यायचं.

आमच्या वडिलांच्या घरी मला आठवतंय की त्यांनी चांदीच्या खुर्च्या केल्या. आणखीन छत्र-चामरं केलं. तर सगळे म्हणे कशाला केलं. याची काय गरज? अहो, लग्नबिग्न होतात. सगळे भाड्याने आणतात. त्यापेक्षा आपलं घरातच असलेलं बरं! जाऊ देत. मग आता ते कुठे लग्न असलं मग त्यांनी विचारलं की अहो, ते आम्हाला छत्र-चामरं पाहिजे. अहो, ते मागच्या वेळेला लग्न झालं होत ना तिथे. तिथून घ्या. मग तिथून ते करत करत कुठल्या कुठे गायब झालं देवाला ठाऊक! पण माझं काय म्हणणं की त्याचा सारा विचारच असा. आता हा प्रश्न आहे की आता आपल्याजवळ पैसे आहेत काय करायचं? त्याचं काहीतरी सामूहिक, सार्वजनिकच काढायचं. बॅडमिंटनचं जर तुम्हाला कोर्ट करायचं असलं तर त्याच्यात सगळ्यांनी खेळलं पाहिजे. हे नाही की आमचीच मुलं खेळतील. माझ्याच मुलाला सगळं. जर त्याने मोटर घेतली आहे तर त्याच्यात सर्वच मुलं शाळेत गेली पाहिजे. मोठी मोटर घ्यायची त्याच्यात सगळेजण गेले पाहिजे. ही सामूहिकता आणि ही सार्वजनिक एक जे आपली तब्येत बनवणं आहे ते या सूर्यापासून शिकलं पाहिजे. आणि आजच्या दिवशी हा विशेष दिवस आहे आणि या दिवशी आपण हे तत्त्व घेतलं पाहिजे की आजपासून आपण काहीतरी सार्वजनिक कार्य करू. कसं काय पोटात अन्न जातं लोकांच्या मला समजत नाही. अहो, शेजारी तुम्ही बघत नाही. तुम्ही काहीही असं सार्वजनिक कार्य केलेलं नाही.

एक लहानसं मी सांगते तुम्ही एक-दोन झाडेच लावायची सुरुवात करा. तरी किती सहजयोगी आहेत आपले महाराष्ट्रात. आणि या सहजयोग्यांनी प्रत्येकी एक-एक झाड लावून त्याची जर जोपासना केली तरी किती उपकार होतील या लोकांवरती. अशी माझी सर्वांना विनंती आहे की काही ना काही तरी सार्वजनिक कार्य काढा. पण त्यात आम्हाला पैसे जमवायचे आहे, हे करायचे आहे. असले धंदे काय करायचेत? 'भटजीला पैसे द्या' सारखा प्रकार नको आपल्याला. सरळ काहीतरी हृदय उघडून, प्रेमाने काही तरी लोकांसाठी करायचे आणि त्याचा आनंद उचलायचा. हे पाहिजे. आता याचं असं म्हणणं नाही की तुम्ही फुकट करा. मी असं कधीच म्हणत नाही की सहजयोगी तिकडून आले आणि फुकट काहीतरी द्या. मुळीच नाही. पण या लोकांमध्ये ही गोष्ट आलेली आहे. आणि येतांना किती बक्षिसं घेऊन आले. अर्थात माझा त्याच्यात पुष्कळ हात असला तरी हे स्वतः कितीतरी घेऊन आलेत तुम्हाला देण्यासाठी. स्वतः आपल्या मनाने इतक्या वस्तू आणल्या यांनी. मला आधी वाटलं की जे मी याला घेतलं होतं, रोमला घेतलं होतं सामान, तर ते सामान मी घेतलेलेच आणलं. तर ते म्हणे 'नाही माताजी, आम्ही तुमचं नाही आणलं. आम्ही आमचं विकत आणलं. तुमच्यासारखं.' त्यांना आनंद की आम्ही हे करून आणलं, ते करून आणलं. हे दिलं. बरं, कुणाला काय दिले तिकडे हे कुणाला माहितीच नाही. इथे मी बसून याला दे रे, त्याला दे रे, याचं नाव घे रे, त्याचं नाव घे रे. तिकडे आपले इंडियन लोकं बसून 'अहो, माझ्या मुलाला अजून काही मिळालं नाही. माझ्या आईला,' ती आई लंगडत लंगडत आली पुढे. म्हटलं तुमच्या आईला घ्या आता. त्यांना लुगडं मिळालं नाही. आता लुगडी नाहीत माझ्याकडे. मग साडीच घ्या. हे प्रकार. या लोकांच उलट आहे. हे लोक आले जिथून किती सामान घेऊन आले. दोन टन सामान म्हणे लोकांनी आणलं. ते दोन टन, माझे हात दुखले देता-देता. असे दोन टन त्यांना सगळ्यांना वाटण्यात आले.

माझं असं म्हणणं आहे की तुम्ही काही द्या. अशातली गोष्ट नाही की यांना काही द्यायचं नाही. पण यांच्यासमोर एक मोठा कित्ता गिरवण्यासारखं आपलं चरित्र दाखवलं पाहिजे की आम्ही लोकसुद्धा काही कमी नाही. आले तर आम्ही तुमच्या सेवेला उभे आहोत. आले तर तुम्हाला आम्ही बघायला उभे आहोत. आपल्याच्याने जे होईल ते करायला काय हरकत आहे? त्याला काही पैसे लागत नाहीत. त्याला काही त्रास लागत नाही. फक्त एक मनाची प्रवृत्ती आपली बदलली पाहिजे आणि ती सहजयोगात जर आपण बदलली नाही तर सहजयोगामुळे मन्वंतर होईल असं मला वाटत नाही. सगळ्यात मोठी प्रवृत्ती म्हणजे दुसऱ्याला देण्याची ही यायला पाहिजे. सहजयोगात कुंडलिनी जागृत होते आणि तुम्ही आत्मा स्वरूप होता. आणि आत्म्याचं तत्त्व म्हणजे सूर्यासारखं सगळ्यांना देण्यासारखं. तुम्ही माझा फोटो पाहिला. त्याच्यामध्ये माझ्या हृदयामध्ये एवढा मोठा सूर्य आला होता. खरोखर माझ्या हृदयात सूर्य आहे. आणि त्या सूर्यामुळेच मला कधीही असं वाटत नाही की यांच्याकडून लुबाडून घ्यावं. म्हणजे कसं काय ते मला समजत नाही. कुठून, डोक्याच्या कोणत्या भागातून हा विचार येतो मला माहिती नाही की हे घ्यावं यांच्याकडून लुबाडून. कसला काय प्रकार आहे. तो तर सहजयोगात आलाच नाही पाहिजे. पण आपल्याकडून काय देता येईल रोज डोकं लावायचं. काय आपण करू शकतो बरं.



आता आपण कोणचं हे करू शकतो.

तुमच्या राहुरीलासुद्धा आम्ही एक संस्था सुरू केली आहे. त्याचं नाव आम्ही 'सहज स्त्री सुधार, समाज सुधार' असं काहीतरी नाव दिलेलं आहे. त्याला संस्था अशी केली कारण आमच्या संस्थेतर्फे अशी कार्य होऊ शकत नाहीत, लाइफ इटर्नल ट्रस्टमुळे. तर इथं ती रजिस्टर करून घेतली. सगळं काही झालेलं आहे. ते कॅनडातले लोक पैसे द्यायला बसलेत. तिकडून लोक पैसे द्यायला बसलेत. पण इथं कुणी मिळतच नाही 'स्त्री सुधार'ला. इथल्या बायकांनी हे कार्य' आपल्या हातात घेतलं तर कार्य होऊ शकतं. इथं जागा आहे, सगळं काही आहे. 'मग आम्हाला वेळच होत नाही. आम्ही कसं जाणार?' अहो, हे लोक तिथून पैसे घेऊन येताहेत तुम्हाला द्यायला. इथल्या स्त्री समाजात सुधार करा. चौदा तुमच्यासाठी मशिनी पाठवून दिल्या. तिथे बायकांना बसवून काही शिकवा. तुम्हाला दिसत नाही का उपाशी तापाशी फिरताहेत. त्यांना बसवा, काहीतरी कार्याला लावा. त्यांच्या दोन-चार पैसे हातात पडतील. त्यांचं भलं होईल. थोडंतरी आपण असा विचार केला पाहिजे. स्वत:पुरतं कसं बघायचं? तेव्हा सहजयोगाला पाहिजे की या गोष्टीला आपल्याला वाव नाही. स्वत:पुरते बघण्याला आपल्याला वाव नाही. जगाच्या कल्याणा आपल्याला आलं पाहिजे. आणि मी नेहमी म्हणत असते की 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' जरी असल्या तरी संतांच्या विभूतीच्या कल्याणासाठी जग आहे. म्हणजे मग झालं. त्या संतांचं कल्याणच होतं अशा परिस्थितीत. म्हणून आता तुम्ही जे संत आहात, तुम्ही संतांच्या दृष्टीने वागलं पाहिजे. आणि संतांचं पहिलं लक्षण म्हणजे देणं. देत राहायचे. कोणत्याही संतानी कुणाचे काही लुबाडलेले आपण तरी काही बुवा ऐकलेले नाही. आणि मग तो संतच राहत नाही. ते त्याच्या डोक्यातच येत नाही. तेव्हा आपण आपल्या परीने काय देऊ शकतो, किती प्रेम देऊ शकतो, किती लोकांचं भलं करू शकतो इकडे लक्ष आपण घातलं पाहिजे. आणि आजकालची जशी सार्वजनिक कार्य निघाली आहेत इलेक्शन वगैरेसाठी तसली काही न करता नि:स्वार्थ भावाने ज्याला आपण आईच्या प्रेमाला निर्व्याज्य म्हणतो, ज्याच्यावरती काही व्याजच

‘रोज नुसतं ध्यानधारणा करून काही उपयोगाचे नाही. तुम्ही लोकांचं काय भलं केलं ते बघितलं पाहिजे.’

देतांना तुम्हाला आपोआप सुचेल मी काय-काय केलं ते. हळूहळू सुधारणा झाली पाहिजे.

सर्व सहजयोग्यांतर्फे काही ना काही तरी घटित झालं पाहिजे. आणि या बाबतीत आपण थोडा तरी वेळ दिला पाहिजे. वेळ देऊन त्याच्यामध्ये लागलं पाहिजे. मेहनत केली पाहिजे. ‘माताजी आल्या म्हणजे एकदा लेक्चर झालं. मग संपलं’ असं नको. या लोकांनी पुष्कळ कामं केली. शाळा सुरू केल्या आहेत आणि पुष्कळ समाजसुधाराचे काम करताहेत. आपणही तशी काहीतरी सुरुवात केली पाहिजे. नाहीतर सहजयोग म्हणजे नुसतं आत्मसाक्षात्कार होऊन आनंदाच्या सागरात पोहोणारे सगळे आळशेश्वर असं नको व्हायला. आपण दुसऱ्यांची काय मदत घेतली. इकडे तिकडे डोळे चारीकडे फिरवून बघावं. त्यांच्याकडे आपण प्रेमाने दृष्टी घालावी. नीट बघावं की आपल्या हातून काय कार्य होतंय!

अजून माझं हिंदुस्थानात येणं झालं नाही. आल्यावर तुम्ही बघाल सगळ्यांना मी कामाला लावणार आहे. तेव्हा आधीच सुरुवात केलेली बरी. सहजयोग म्हणजे नुसते बसून इथे ध्यानधारणा करण्यासाठी सहजयोग मुळीच नाही. नुसतं ध्यान करायला कशाला सहजयोग पाहिजे? मग हिमालयावर जा. इथे राहून जर सहजयोग करायचा असला तर त्या सहजयोगातून लोकांचं भलं झालं पाहिजे. आणि आजकालचे जे सार्वजनिक कार्य आहे त्या पद्धतीचं मुळीच करायचं नाही. खरोखरं कार्य सिद्ध केलं पाहिजे. तरच म्हटलं पाहिजे की आम्ही सहजयोग हा स्थापित केला आहे. आता माझी पुष्कळ स्तुती झाली. मी ऐकली पुष्कळ स्तुती. गाणं ऐकलं. फार बरं वाटलं. सगळं काही संतोष झाला. लोकांनी ओळखलं वगैरे वगैरे, पण एक गोष्ट ओळखली पाहिजे की तुम्ही काय आहात ते जाणण्यासाठी कार्य केलं पाहिजे नाहीतर तुम्ही स्वत:ला आरशात बघू शकत नाही. तुम्हाला काय दिलं ते तुम्हाला दिसलं पाहिजे. जसं तुम्ही पूर्वी स्वयंपाक करत होता. मुलाबाळांना बघत होता तशी जर तुमची परिस्थिती असली आणि त्याला बिलकूल सार्वजनिक किंवा सामूहिक स्वरूप आलेले नाही तर सहजयोग मिळून तरी तुम्ही काय मिळवलं मला समजत नाही. जसेच्या तसे. तेव्हा पुढल्या वर्षी आल्यावरती निदान तरी सगळ्यांनी सांगितलं पाहिजे की किती तुम्ही वडाची झाडं लावली पहिली गोष्ट.

दुसरी, तुम्ही कोणतं सामूहिक कार्य केलं मला ऐकायला मिळालं पाहिजे. कोणतं ना कोणतं सामूहिक कार्य बघितलं तर तुमच्या नजरेत येईल, तुम्ही ते करू शकता आणि व्यवस्थित करू शकता. त्याला काहीही पैशाची गरज लागत नाही. नुसती मनाची तयारी पाहिजे. हा सहजयोग जेव्हा मी उभा केला होता तेव्हा एका बाईवर, तिला पार करून एका पैशाच्या आधाराशिवाय, घरूनही त्यावेळेला मला मुळीच कोणत्याच तऱ्हेचा सपोर्ट नव्हता, मी सुरू केला. पण त्या कार्याच्या निष्ठेमुळे आणि त्याच्या सत्यतेमुळे तो आज एवढा फोफावला आहे. आता तुमच्या प्रत्येकीवर, प्रत्येक माणसावर, प्रत्येक बाईवर ही एक मोठी जबाबदारी आहे की आम्ही सहजयोगाला लोकांची ओळख करून देतांना काही ना काही तरी त्याचा पडताळा दिला पाहिजे. हातात त्यासाठी काही कायदा घ्यायला नको. त्यासाठी कोणतं गैरवाजवी काम करायला नको. कोणत्याही चुकीच्या गोष्टी करायला नको. सरळ मार्गाने तुम्ही नुसते डोळे उघडून बघा की आम्ही काय करू शकतो. लोकांचं आम्ही कुठे काय हित करू शकतो. ते आणि आम्ही तुम्हाला शक्ती द्यायला बसलेलो आहोत. तुम्ही त्या ह्याच्यात पडावं. आणि या कार्यात आम्हाला काही व्होट नको, आम्हाला काही पैसे नकोत, काही नाही. आम्ही काहीतरी असं कार्य सुरू करणार असं एक वचन द्यायचं. दुसरी गोष्ट त्यात अशी अडचण असते की लोक जर सुरू करतात मग चार ठिकाणी पैसे मागायला जातात. आधी पैसे आणायचे. पैसे मुळीच मागू नका. पैशाशिवाय जे काम होईल ते आधी सुरू करा. आधी पैसे एकत्र, प्रत्येकाला असं वाटतं की पैशाशिवाय काम होत नाही. तुमच्याकडे शक्ती आहे तुम्हाला पैसे कशाला पाहिजे? कोणी आजारी असला शेजारी तर जाऊन बघावं, त्यांच्याकडे आजार आहे, त्यांच्याकडे त्रास आहे त्यांना बघावं. मी बघते ना कुणी आजारी असला तर त्याच दिवशी एक गृहस्थ कुणी आजारी आहे त्यांचा हात हा झालेला. अहो, दोन मिनीटाचं काम. सहजयोगाने कुणीही ठीक केलं असतं. तर घेऊन आले त्याला माझ्याकडे. ते अगदी प्रोग्रामच्या मधोमध. ‘याचा हात ठीक करा.’ आता एवढे तुम्ही



सहजयोगी असून, तुमच्या हातातून शक्ती वाहत असून हे लोक कधीही नाही आले. तेवढ्यातल्या तेवढयात तुम्हाला बरा नाही करता आला तर तुम्हाला सहजयोगी होऊन फायदा काय झाला? तेव्हा 'माझी आई आजारी, माझा बाप असा आहे. त्याचे पाय मोडले.' 'अहो, तुम्ही नीट करा की. तुमच्यात आहे ना शक्ती, करून तर बघा.' तेव्हा लोकांची मदत केली पाहिजे. काहीही अपेक्षा न करता. आनंदात, त्या भावनेने. ज्याच्यामध्ये खरोखर अत्यंत आनंद आहे. ही आम्ही काहीही नाही. परमेश्वराचे एक साधनमात्र होऊन जगामध्ये, या देशामध्ये, या कुटुंबामध्ये काहीतरी विशेष देतोय. केवढी मोठी ही धारणा. केवढी मोठी गौरवाची गोष्ट आहे असं समजून जर तुम्ही सगळ्यांनी निश्चय केला तर काही ना काही तरी तुमच्या हातून घडेल. आणि मग लोकांना पटेल की सहजयोग म्हणजे काय?

आता सगळे लोक असं सहजयोग म्हणजे काय? सगळे ध्यानात बसलेत. झालं, आपल्या देशात काही गडबड झाली तर ध्यानातच आहेत. 'आता आमची बायको म्हणे स्वयंपाक नाही करत.' म्हटलं 'का?' 'ती ध्यानच करत बसते.' 'असं का? कुणी सांगितलं तिला? स्वयंपाक पहिल्यांदा करायचा.' ध्यानाला पाच मिनीट पुष्कळ झाली. तुम्हाला शक्ती दिली की तुम्ही उत्तम स्वयंपाक कराल. तेव्हा एक तऱ्हेचा आपल्यामध्ये विश्वास असायला पाहिजे आणि कार्याची क्षमता असायला पाहिजे. शक्ती आम्ही देतो ती घ्या. रोज नुसतं ध्यानधारणा करून काही उपयोगाचे नाही. तुम्ही लोकांचं काय भलं केलं ते बघितलं पाहिजे. तुमचं भलं झालं आमचं भलं व्हावं. माझ्या मुलासाठी करा, माझ्या नोकरीसाठी करा, माझ्या आईला ठीक करा, बापाला ठीक करा, अमक्याला ठीक करा, माझ्या घरी या, अमकं करा, तमकं करा सगळं माझ्यावरच अधिकार आणि तुम्ही काय करणार? आम्ही काहीतरी केलं पाहिजे. माताजींना आम्ही करून दाखवू काहीतरी विशेष असा मनाचा हिय्या करावा. आणि माझ्यासमोर खरोखर असं चित्र उभं आहे की सहजयोगी जाऊन जे वर्णन ज्ञानेश्वरांनी केलेले आहे 'बोल ते पियुषांचे सागर' 'पियुषांचे सागर' ते कुठे आहे ते बघायचे आहे आम्हाला. तर सगळ्यांना आजच्या या सुदिनी गोड गोड आशीर्वाद! सगळ्यांनी सगळ्यांचं उत्तम करावं, भलं करावं, सगळ्यांना प्रेमाने



आज संक्रांती आहे .....

आपसात प्रेम वाढवण्यासाठी तीळ आणि गूळ देतात ।

– १७ जानेवारी २००८, पुणे